# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 06.12.2010 (का.प.क्र. 9) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

सोमवार दिनांक 06 डिसेंबर 2010 (का.प.क्रं.9) रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी 03.45 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से., नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्ष्मणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.विकास रतनलाल जैन
05. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
06. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
07. स. सौ.साधना गणेश सुरडकर
08. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
09. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
10. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
11. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
12. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
13. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**चर्चा :**

श्री.रेणुकादास वैद्य : आरसीएच बाबत चौकशी समिती नेमुन अहवाल पुढील बैठकीत देण्यात यावा म्हणुन आदेशीत करण्यात आले होते. माहिती अद्यापही अप्राप्त आहे.

श्री.मधुकर सावंत : आज आपण विषय पत्रिका घेणार असाल तर विषय क्रमांक 67 इतिवृत्त कायम करणेचा आहे. माझी विनंती आहे की, विषय क्रमांक 67 इतिवृत्त पुढील बैठकीत घेण्यात यावे त्यावर चर्चा करावयाची आहे. थांबवून ठेवा. पुढच्या वेळेस चर्चा करून मंजूरी देण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य : आरसीएच नियुक्ती प्रकरणाचे चौकशीसाठी दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली होती. दोन नियुक्त अधिकारी चौकशी करणार व येत्या बैठकीत अहवाल सादर करणार होते. परंतु अहवाल अद्यापपर्यंत सादर झालेला दिसत नाही. मा.सभापती यांचेकडे अहवाल आला असेल तर खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : अद्यापपर्यंत माझ्याकडे अहवाल आलेला नाही. संबधीत नियुक्ती केलेल्या अधिकाऱ्यांनी त्याच्यावरती काय कार्यवाही केली त्याचा खुलासा करण्यात यावा. संबधीत अधिकारी यांनी पुढील बैठकीत सविस्तर अहवाल सादर करावा. यामध्ये कोण होते. श्री.जाधव व श्री.काझी होते का? त्यांनी खुलासा करावा. श्री.पठाण साहेब यांना पत्र गेले पाहिजे तुम्हाला यांना या चौकशीसाठी नेमण्यात आलेले आहे. विभागातुन पत्र गेले पाहिजे. इतिवृत्त द्यायला पाहिजे. माहिती द्यायला पाहिजे. नसेल माहिती द्यायची तर फोनद्वारे माहिती सांगायला पाहिजे.

श्री.विकास जैन : मा.सभापती साहेब महत्वाचा विषय आहे. पहिले आचारसंहितेमध्ये दोन महिने गेलेत.

मा.सभापती : पुढच्या मंगळवारी बैठक ठेवण्यात येणार आहे पुढील बैठकीत सविस्तर अहवाल सादर करावा.

श्री.मधुकर सावंत : गेले अनेक दिवसापासून अनेक महिण्यापासून आपण महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये जे वर्तमानपत्र चालतात, आपण ज्या ठिकाणी ट्रस्टी म्हणून काम करतो, रोजच्या कुठलेही वर्तमानपत्र उघडले तर वर्तमानपत्रामध्ये महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली आहे. आयुक्त काम ऐकत नाही. कर्मचारी काम ऐकत नाही. सारख्या बैठका चालू आहेत. कुठलेही नगरसेवकाचे काम होत नाही. आज तीन हजाराचे काम करण्यासाठी नगरसेवक संचिका घेवून दारोदारी फिरायला लागले आहे. नगरसेवकांची हालत ही खराब झालेली आहे. वर्तमानपत्रातुन आल्यामुळे नागरीकही नगरसेवकाला रस्त्यावर फिरू देत नाही. साधे प्रश्न विचारतात. हा जो उहापोह चाललेला आहे. वर्तमानपत्र उघडले की, सर्वात पहिले असते की, महानगरपालिकेची अशी हालत खराब आहे तशी हालत खराब आहे. परेशानीत आहे. पैसे नाही. आयुक्तांचे अधिकारी ऐकत नाही. अधिकाऱ्यांचे कर्मचारी ऐकत नाही. नगरसेवकांचे कुणी ऐकत नाही. हा जो प्रकार चाललेला आहे हा प्रकार कधी थांबणार आहे. गेली 10 ते 11 वर्षापासुन मी पहातांना 19 आयुक्त पाहिले. फक्त एका आयुक्तांने तीन वर्ष पुर्ण केलेले आहे. बाकी सगळयांचा कार्यकाल बघीतला तर कमी अधिक प्रमाणात चांगला होता. पण आता तो कार्यकाल चालु आहे. मा.आयुक्तांचा एक वर्षभराचा कार्यकाळ अतिशय वाईट परिस्थितीत आलेला कार्यकाळ आहे. नगरसेवकाने महानगरपालिकेत यावे की, नाही काम होणार आहे की, नाही, अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या परिस्थितीवर मात करणेसाठी मा.आयुक्त काही चांगले निर्णय घेणार आहेत का? कारण काय होत आहे. मा.आयुक्त नेहमी बैठका घेतात. दोन दोन चार चार तास बैठकीमध्ये असतात. बैठकीमुळे कुठलेच काम मार्गी लागत नाही. हा विषय कधी थांबणार आहे. हा सभागृहात मा.आयुक्तांनी खुलासा करावा. जेणे करून महानगरपालिकेतील नगरसेवकाला उजळमाथ्याने शहरामध्ये वार्डामध्ये नागरीकांपुढे फिरून सांगता येइल. इतके पैसे येणार आहे. जाणार आहे. काम करणार आहे. काम होणार आहे. काम होणार नाही असे काही सांगता येईल.

आज कुठल्याच नगरसेवकाला माझ्या माहितीप्रमाणे 15 ते 16 नगरसेवक इथे बसलेले आहे. कुठल्याच नगरसेवकाला सांगता येणार नाही की वार्डात कुठले काम होणार आहे. काहीच सांगता येत नाही. नागरीक नगरसेवकाला निवडुण देतात. मतदान देतात. उत्तर द्यायला कुठल्याच नगरसेवकाला उत्तर नाही. मला वाटते या सभागृहातील कुठल्याच नगरसेवकाला नागरीकांना उत्तर देता आले नसेल. इतकी वाईट अवस्था महापालिकेची याच्या अगोदर झाली नव्हती. मा.आयुक्तांनी खुलासा करावा. यास जबाबदार कोण आहे खुलासा करण्यात यावा.

श्री.अमित भुईगळ : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिवर्तन दिनानिमीत्त सर्वांनी दोन मिनिट अभिवादन करण्यात यावे. अशी विनंती करण्यात येते.

श्री.मधुकर सावंत : स.सदस्याच्या विनंतीस माझे अनुमोदन आहे.

मा.सभापती : डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिवर्तन दिनानिमीत्त दोन मिनट अभिवाद करण्यात यावे.

(सभागृहात सर्व उपस्थित स.सदस्य,अधिकारी/कर्मचारी यांनी दोन मिनटं स्तब्ध उभे राहुन अभिवादन केले.)

श्री.रेणुकादास वैद्य : स.सदस्य श्री.मधुकार सावंत यांनी जो विषय मांडला तो अतिशय गंभिर स्वरूपाचा विषय आहे. मागच्या दोन तीन महिण्याच्या कार्यकाळात वृत्तपत्रात महापालिकेच्या बाबतीमध्ये ज्या बातम्या येत आहे सातत्याने नागरीकांमध्ये नगरसेवकाबद्दल गैरसमज होत आहे. या सर्व गोष्टींस नगरसेवक जबाबदार आहे का? की प्रशासन जबाबदार आहे. याची जबाबदारी कुणी घ्यायची. नगरसेवकांमुळे ही वेळ आली आहे का प्रशासनामुळे ही वेळ आली आहे. चुकीच्या धोरणामुळे हि स्थिती आलेली आहे का? जे काही असेल या बाबतीत मा.आयुक्तांनी खुलासा करावा. असे मला वाटते. कृपया मा.आयुक्तांना खुलासा करण्याची सूचना द्याची

श्री.अमित भुईगळ : फॅक्ट जे ते कशामुळे हे झालेले आहे ते समोर आले तर बर होईल कारण लोकांना तोंड दाखवायला जागा नाही राहीली. आठ महिणे निवडुन झालेले आहे. खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : नगरसेवकानी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या खरोखर रास्त आहे. कुठल्याही प्रकारचे विकासाचे काम होत नाही मा.आयुक्तांनी यावर कोणकोणत्या उपाययोजना केल्या याचा खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : स.सदस्यानी ज्या भावना व्यक्त केल्यात की, गेल्या काही दिवसांपासून महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती खराब. महापालिकेचे काम चांगले नाही. तसेच वर्तमानपत्रात ज्या बातम्या आहेत त्यावरून नगरसेवकांची व महानगरपालिकेची बदनामीच्या स्वरूपात समोर येत आहे. अशा प्रकारची जी भावना झालेली आहे ती काही प्रमाणात बरोबर आहे. महापालिकेत काम करत असतांना अनेक स.नगरसेवक अनेक वर्षापासुन काम करत आहे त्यांनी मनपाच्या बेसिक बाबींची पहाणी केलेली आहेत आताही समोर आलेल्या आहेत. महापालिकेने काम केले नाही किंवा करित नाही असेही नाही.महानगरपालिका काम करत आहे परंतु हया बदललेल्या कालावधीमध्ये

कामासाठी लागणारा पैसा, पैसा उभा करण्यासाठी लागणारी यंत्रणा, यंत्रणेने केलेले काम, लोकांच्या असलेल्या अपेक्षा, माहितीचा अधिकार आणि यामुळे लोकांच्यामध्ये झालेली जागृकता. काम करत असतांना नागरीकांचा असलेला सहभाग वेगवेगळया माध्यमातुन मनपास मिळणारी मदत. आर्थिक स्त्रोत हया सगळयाच बाबी. परिस्थिती फार बिघडली असे मला अजिबात वाटत नाही पण खुप चांगली आहे असेही म्हणणार नाही. या निमीत्ताने बेसिक विषयामध्ये जाण्याची गरज आहे. महानगरपालिकेच्या कामाचे स्वरूपही बदलत आहे. आमचा असलेला आकार (Area) वाढलेले क्षेत्र आणि असलेली यंत्रणा याचा ताळमेळ तसा फारसा कुठे राहीला आहे असे मला वाटत नाही. मनपाचा आकृतिबंध जो असणे आवश्यक आहे. जो सरकारने ठरवुन दिलेला आहे त्या पैक्षा आणखी वाढीव कशाची गरज आहे. हे पाहणे आवश्यक वाटते. गेल्या 20 वर्षापुर्वी महानगरपालिका कार्यरत होती जो स्टाफ कार्यरत होता. त्यानंतर शहराचा आकार अनेकपटींनी वाढला. लोकसंख्या वाढली. परंतु स्टाफींग पॅटर्नमध्ये फारसा बदल झालेला नाही. क मध्ये असलेली महानगरपालिका ड मध्ये गेली आणि त्याच्यामुळे स्टाफिंग पॅटर्नचा फटका मनपास बसलेला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पहात आहे. प्रत्येक खात्याची प्रत्येक विभाग प्रमुखाची ही जबाबदारी आहे. माझे आजचे काम किती आहे. एका कर्मचाऱ्याने 13 Refrence काढले पाहिजे. एका विभागात 10 कर्मचारी असतील तर 130 Refrence निघाले पाहिजेत. 10 कर्मचाऱ्यांकडून 130 Refrence निघतात का हे जोपर्यंत HOD कडून पाहिले जात नाही. तो पर्यंत काम किती आहे हेच समजत नाही. हे बघितले पाहिजे. तेव्हाच शासनाला सांगु शकू की, मनपास स्टाफिंग पॅटर्न बदलण्याची गरज आहे. आज जे कर्मचारी आहे त्यातील काही कर्मचारी काम करीत नाही हे ही खरे आहे. काही कर्मचारी/अधिकारी यांना ओव्हरलोड काम आहे. हा बेसिक मुद्दा लक्षात घेऊन निट करण्याची गरज आहे. असे मला पहिल्यापासून वाटते. ही जी यंत्रणा आहे ती तपासण्याची जबाबदारी आयुक्त म्हणुन प्रमुख माझी जबाबदारी मी टाळणार नाही. मी माननार आहे. सर्व स्तरावरचा जबाबदाऱ्या माझ्याकडे दिलेले लोक काम करतात की, नाही वसुलीचा मुख्य प्रश्न आहे. उत्पन्नाचे स्त्रोत जकात सोडली तर बाकीचे स्त्रोत हे डळमळीत आहे. म्हणुन वसुलीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. वसुलीत वाढ होण्यासाठी गेल्या 6 महिन्यापासून वेगवेगळे प्रयत्न सुरू आहे. अभय योजने अंतर्गत तीन हजार नळ कनेक्शन अधिकृत करून घेतलेत. 1100 कनेक्शन तोडुन टाकले. अनेक ठिकाणी फौजदारी केसेस दाखल केलेल्या आहेत. मालमत्ता कर वाढ होण्यासाठी वसुलीसाठी वेगवेगळे प्रयत्न केलेत. दिनांक 16.08.2010 पासुन 100 कर्मचारी वसुलीसाठी नेमलेले आहेत काही कर्मचारी काही कारणास्तव रूजु झालेले नाही आणि जे काम आहे तेही फारसे समाधानकारक नाही. मध्यंतरी पुन्हा 70 कर्मचाऱ्यांच्या ऑर्डर काढल्यात. टॅक्सची आकारणी व्यवस्थीत केलेली नाही त्यामुळे टॅक्स डिपार्टमेंन्ट वेगळे केले. 33 जणांचा समावेश करण्यात

आला आणि वेगळी यंत्रणा उभी केली. यापुर्वी झालेले प्रयोग होते, जे सत्यम, स्पेक, इआरपी दुर्दैवाने हे प्रयोग काही दिवस चांगले चालले व बंद पडले. बेसिक सिस्टीम सुधारण्यासाठी सर्वचजण कमी पडलो आहे. यामध्ये सर्वांचाच समावेश आहे असे मला वाटते. यामधुन तोडगा काढण्यासाठी मार्ग काढण्यासाटी नव्याने प्रयोग सुरू केले आह. तीन कार्यकारी अभियंता यांना 100 लोकांच्या बडया थकबाकीदार यांच्या यादया दिलेल्या आहेत. अधिकार दिले आहे. लोकांचे म्हणणे आहे की, वसुली जास्त लावलेली आहे. या संबधीचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना दिलेले आहे. मोठया थकबाकीदारांच्या यादया देऊन आठ दिवस त्यांचेशी संपर्क साधुन वसुलीमध्ये वाढ कशी होईल याकडे पहावे. मनपाचा वर्धापन दिनानंतर वसुलीवर विशेष लक्ष केंद्रीत करणार आहे. मध्यंतरी दिवाळी दसऱ्याच्या दरम्यान रस्त्यावरील, शहरातील खड्डे बुजवण्याचा कार्यक्रम असेल लाईट तपासणीचा कार्यक्रम, साफसफाईचा कार्यक्रम असेल अनेक मोठयाप्रमाणात यंत्रणा कामाला लावुन पहाटेपासुन लोकांना रस्त्यावर उतरवुन कामाची तपासणी करण्यात आली. फॉगींगची फवारणी, तपासणीचा कार्यक्रम करण्यात आला आहे.100 टक्के सुधारणा झालेली नाही. महानगरपालिका, प्रशासन कमी पडलेले आहे. असे मला आजीबात वाटत नाही.

श्री.मधुकर सावंत : नगर रचना विभागात 31 कोटीचे टार्गेट बजेट मध्ये दिलेले आहे. 10 कोटी वसुली झाली आहे. प्रत्येक कनिष्ठ अभियंता 1.5 लाख याप्रमाणे 31 / 365 रोज 8 ते 8.5 लाख ज्या ठिकाणाहून मनपास उत्पन्न आहे तेथील अधिकारी/कर्मचारी यांना वसुलीवर पाठविले जाते. कितपत योग्य आहे. टि.पी.मधुन 8 इंजिनिअर काढुन टॅक्स वसुलीसाठी लावण्यात आले. हि प्रशासनाची चुक आहे की नाही.

मा.आयुक्त : हि आजिबात चुक नाही. टि.पी.मध्ये जी पदे मंजुरी झालेली आहे त्या पेक्षा जास्त कर्मचारी संख्या आहे.

मा.सभापती :वसुलीसाठी प्रशासनाचे प्रयत्न चालु आहे. पुर्ववत कर्मचारी त्या ठिकाणी पाठविण्यात आले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : वसुलीच्या नावांखाली कर्मचारी घरी जाऊन बसतात. 5 हजार रूपये सुध्दा वसूल होत नाही, आरोपासाठी बोलत नाही. मा.आयुक्तांचे चुकते असेही म्हणणे नाही. दिवसभरात 02 फाईली लिहीली तर 5 लाख उत्पन्न होईल. आपले 5 लाख रूपयेही बुडणार.

मा.सभापती : ज्या ज्या ठिकाणी असे झाले आहे त्या ठिकाणी परत घेतले आहे. कार्यकारी अभियंत्यांनी वसुलीसंदर्भात काय कार्यवाही केली माहिती देण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : मा.आयुक्तांनी स्थितीत सुधारणा करण्याकरीता विविध प्रयत्न केले. परंतु काहीही रिझल्ट आलेला नाही. मालमत्ता वसुलीचे खाजगीकरण करण्यात यावे. मनपाच्या कर्मचाऱ्यांच्या प्रशासनाचे वसुलीसंदर्भात काहीही होत नाही. खाजगीकरणाकडे जावे अशी माझी सूचना आहे. प्रामाणिकपणे विचार करावा अशी माझी सूचना आहे.

मा.आयुक्त : कायम त्या विभागातुन काढण्यात आलेले नव्हते आठ ते पंधरा दिवसासाठी वसुली करण्यात यावी अशी प्रशासनाची अपेक्षा होती. दहा दिवसांमध्ये 10 कोटी वसुल करावे अशी अपेक्षा या कर्मचाऱ्यांकडून होती. खालच्या स्तरावर पाठपुरावा करणे आवश्यक आहे. ज्यावेळी लक्षात आले की, टि.पी.मध्ये उत्पन्नाचे स्त्रोत जास्त असतांना कर्मचारी हलविण्यात आले ते पुन्हा त्या ठिकाणी नेमण्याची कार्यवाही प्रशासनाने केली.

श्री.रेणुकादास वैद्य : जकातीचे खाजगीकरणाच्या वेळेस तेथील जो स्टाफ होता तो वसुलीसाठी कायम लागणार होतो. त्याचे काय झाले सदरील कर्मचारी गेले कुठे.

मा.आयुक्त : आस्थापना अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.नासेर खान : प्रत्येक मिटींगच्या वेळेस मा.आयुक्त एकच बोलतात की, अधिकारी ऐकत नाही, अधिकारी यांचेवर वचक यांचे पाहिजे. कर्मचारी चेंज केल्यामुळे वसुलीत किती वाढ झाली खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त : उपआयुक्त यांनी खुलासा करावा. हे आदेश झाल्यानंतर किती वाढ झाली.

श्री.नासेर खान : प्रत्येक सभेत मा.आयुक्त सांगतात, अधिकारी काम करत नाही. अधिकारी यांचेवर प्रशासनाचे वचक पाहिजे की, यामूळे आमची बदनामी होते. आपणांकडे अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचे अधिकार नाही का. किती वसुलीत वाढ झाली.

अस्थापना अधिकारी-1 : 68 कनिष्ठ लिपीक, 18 व.लि., इन्स्पेक्टर, 80 चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि 12 सुरक्षारक्षक जकात खाजगीकरण झाल्यानंतर मुख्य कार्यालयास वसुलीसाठी स्टाफ देण्यात आलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : आधिचा स्टाफ सोडुन जकातचा ॲडिशनल स्टाफ देऊनही काही वसुली झाली नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : वसुली उलट कमी झालेली आहे. जकातीचे खाजगीकरण केल्यानंतर वसुलीचे प्रमाण कमी झालेले आहे. प्रशासनाने खुलासा करावा की, ॲडिशनल स्टॉफ देऊनही रिकव्हरी वाढली की घटली.

श्री.महेश माळवतकर : आताच सांगण्यात आले, जकात खाजगीकरणानंतर तेथील स्टाफ वसूलीवर आला. कर्मचाऱ्यांची भावना अशी झाली आहे की, काही झाले तरी पगार मिळतो, जकात खाजगीकरणातुन पैसा येतो त्यात पगार केले जातात नगरसेवकांच्या कामामध्ये कात्री लावली जाते. ड्रेनेज, लाईट, रस्त्याचे काम हे काम करायला पैसे नाही. परंतु असे होत नाही. पैसे नाही म्हणुन पगार थांबवला. असे थांबेल याची भावना निर्माण केली पाहीजे अन्यथा खाजगीकरणातुन वसुलीसाठी कितीही स्टाफ दिला तरी फरक पडणार नाही. कर्मचारी फक्त कागदावर काम करीत राहील. मनपाचे हित कोण बघणार सभागृहात जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी या ठिकाणी आलेलो आहोत. आपण करत असलेले प्रयोग चुक नाही परंतु आपण तक्ता दिला होता, त्यात फक्त आठ हजार लोकांकडे 13 कोटी बाकी आहे हे दाखवले जाते तर मोठया थकबाकीदारांकडे वसुलीसाठी कुठली कार्यवाही केली. सिडको हडकोतील सामान्य नागरीकाचें 1800 रूपये थकले तरी प्रशासन वसुलीसाठी दबाव आणला जातो. नळ तोडतात, दम देणार हे प्रयोग लहान

ग्राहकांवर करतात. मोठ्या थकबाकीदारांसाठी काय करता. लेखा विभागाने दोन महिण्यापुर्वी 8100 लोकांकडे 13 कोटीची थकबाकी दर्शविली आहे. त्यातील किती वसुल झाले. वर्धापन दिन साजरा करण्याकरीता निधीची कमतरता आहे. 10 लाख लोकसंख्येची महानगरपालिका चालवली जात आहे मनपा अकार्यक्षम नाही परंतु याठिकाणी काम करण्याचे ठरविले पाहिजे. 4000 कर्मचारी मनपामध्ये काम करतात त्यांची जबाबदारी आहे की, शहरातील जनतेस चांगल्या सोईसाठी, जे कर भरतात, त्यांचे दारापर्यंत विकासाची कामे पोहचावी. केंद्राचा, राज्य शासनाचा पैसा कधी येणार. वसुलीच्या प्रमाणात येणारे पैसे वसुल केले जात नाही याची जबाबदारी प्रशासन घेणार आहे का? पुढील चार महिण्यात मोठया थकबाकीदारांना कायद्याचा धाक दाखवला पाहिजे. तर विकासाचे कामे होतील. वसुली ही 12 महिणे चालले पाहिजे. फक्त मार्च मध्ये करून उपयोग नाही.

मा.आयुक्त : वसुलीचा प्रश्न गंभिर स्वरूपाचा आहे म्हणून वर्ग-4 कर्मचाऱ्यांचे पगार करावे, असे आदेशित केले. वर्ग 1 ते 3 कर्मचाऱ्यांचे पगार हे वसुलीच्या आधारे होतील. जकातीचे कर्मचारी वसुलीवर दिलेले आहे त्यांचा कामाची कार्यक्षमता बघीतली जाईल. मालमत्ता वसुलीचे खाजगीकरण करायचे असेल तर वसुलीच्या कर्मचाऱ्यांना कमी करण्याचे धोरण केले पाहिजे. अस्थापना विभागाने तातडीने कार्यवाही करावी. इमारत निरीक्षक आणि टिपी मधील कर्मचारी अनेक दिवसांपासून काम करतात ते बदलले पाहिजे. अशा काही तक्रारी होत्या. या बदल्यांचा भाग म्हणूनच हे सर्व कर्मचारी बाजुला काढले होते. त्यांचे ठिकाणी वेगवेगळे कर्मचारी द्यायचे होते. तसेच कार्यकारी अभियंता यांचे दोन दोन वार्डाचे काम बदलुन पुन्हा पुर्वीसारखे कामाचे वाटप करायचे आहे. यांचेकडुन माहिती प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे स्टाफ नेमुण आदेश काढायचे आहेत.

मा.सभापती : शहर अभियंता यांनी मा.आयुक्तांनी सांगीतल्याप्रमाणे आदेश तयार झाले असल्यास मा.आयुक्तांकडे देण्यात यावे खाते वाटप करण्यात येईल. आता आणुन द्यावे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : वॉर्ड इंजिनिअर यांना त्यांचे कार्यरत वार्डातच वसुली करण्याकरीता आदेशीत करण्यात यावे दुसऱ्या प्रभागात आदेश काढल्यामुळे आमच्या प्रभागातील कामे खोळंबली जातात इस्टिमेट तयार होत नाही. त्यामुळे ज्या त्या भागातील कर्मचाऱ्यांना त्यांच्या बदलीच्याच वार्डात वसुलीसाठी आदेशीत करावे.

मा.सभापती : वसुलीसाठी ज्या ठिकाणी कार्यरत असलेल्यांना दुसरीकडे न देता त्याच ठिकाणी वसुलीसाठी देण्यात यावे.

श्री.जगदिश सिध्द : प्रशासनाने खुलासा करावा की, वसुली अधिकारी/कर्मचारी यांनी किती वसुली केली.

मा.सभापती : या वार्डातुन त्या वार्डात पाठविण्याचे लॉजिक काय आहे? माहिती देण्यात यावी.

उपआयुक्त (म) : प्रत्येक निवडणुक वार्ड या प्रमाणात 99 वसुली कर्मचारी यांचे नियोजन मा.आयुक्तांच्या बैठकीत आणि पदाधिकारी यांचे स्तरावर ठरले होते.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी आदेशित करण्यात आले होते का. या वार्डातुन त्या वार्डात पाठविण्याचे लॉजिक काय सांगण्यात यावे.

उपआयुक्त (म) : 99 निवडणुक प्रभागांसाठी प्रत्येकी एक कर्मचारी या प्रमाणात हे आदेश काढण्यापुर्वी देखील 15 दिवसांसाठी या कर्मचाऱ्यांना वसुलीसाठी पाठविण्यांत आले होते. वार्ड कार्यालयाकडुन सदरचे कर्मचारी परत आले पुन्हा 99 प्रभागासाठी 5/2011 पर्यंत प्रत्येकी वार्ड एक प्रमाणे 99 कर्मचारी द्यायचे होते. पुर्वी ज्या कर्मचारी ज्या ठिकाणी काम केले होते. त्या प्रभागात काम केलेले असल्यामुळे त्यांना कायम ठेवण्यात आलेले आहे. स.सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे एका प्रभागात काम करत असलेला अभियंता दुसऱ्या प्रभागात वसुलीसाठी जातो आहे. त्यामुळे गैरसोय निर्माण होत आहे. हि बाब दुरूस्ती करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

श्री.रेणुकादास वैद्य : कर्मचाऱ्यांच्या नियुक्ती केल्यानंतर वसुलीत किती वाढ झाली.

उपआयुक्त (म) : याबाबतीत उपआयुक्त (प्र) खुलासा देतील.

मा.सभापती : दुसऱ्या प्रभागात टाकण्याचे लॉजिक काय होते खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (म) : 99 कर्मचाऱ्यांचे आदेश 8-10 दिवसांसाठी काढण्यात आले होते.

मा.सभापती : ज्या वार्डात कार्यरत आहे तेथुन दुसऱ्या वार्डात वसुलीसाठी दिले परंतु ज्या वार्डात कार्यरत आहे तेथे इस्टिमेट तयार करू शकतो. वसुलीही करू शकतो एरियाबाबतची माहिती त्यास असते. एका वार्डातुन दुसऱ्यावार्डात टाकणे हे प्रशासनाचे वेळ काढुपणा चालले आहे.

श्री.विजय वाघचौरे : नगरसेवकांची दिशाभुल करण्याचे काम चालु आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : मा.सभापती यांनी आदेशित केले होते त्यावर कार्यवाही झाली का? हे कामे कुणी करायची. प्रशासनाने काहीच कार्यवाही केली नाही.

मा.सभापती : खालुन मीसअंडरस्टॅंडिंग करता आहेत का हा भाग प्रशासनाचा आहे. सर्व सदस्यांचे म्हणणे आहे की, फक्त टाईमपास करणे चालु आहे वेळ काढु पणा चालु आहे.

श्री.मधुकर सावंत : माझा आरोप आहे की, मा.आयुक्तांना खालच्या स्तरावरून सर्व अधिकारी मीसगाईड करतात, चुकीचे सांगतात. त्यामुळे त्यापध्दतीने निर्णय घेतात ते चुकीचे असतात. दिवसभरातुन घेतलेल्या दहा निर्णयातुन नऊ निर्णय चुकीचे असतात. आपल्याला उदाहरण देऊ शकतो.

श्री.रेणुकादास वैद्य : क्रॉस व्हेरिफिकेशन करण्यात यावे. गरज पडल्यास स.पदाधिकाऱ्यांना विचारणा करण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत : मा.आयुक्तांच्या दालनात येवुन मा.आयुक्तांना सांगण्यात आले होते की, चांगल्या हुशार लोकांचा महानगरपालिकेमध्ये संच आहे. त्यांचेशी वार्ड अधिकाऱ्यांशी बसुन चर्चा करा. चांगले मार्गदर्शन प्राप्त होईल्. डेप्युटी इंजिनिअर, कार्यकारी अभियंता यांनी काही सांगीतले की, निर्णय घेतात. दिवसभरातील दहा निर्णयापैकी नऊ निर्णय चुकीचे असतात. मग गोंधळ

निर्माण होतो ते सुधारण्यासाठी वेळ जातो. असे मला वाटते. महानगरपालिका ड वर्गात गेलेली आहे. शासनाच्या अधिकाऱ्यांना ज्या सुखसुविधा देतो आहे त्या खरेच गरजेच्या आहेत का? देऊ शकतो का? आपली आर्थिक परिस्थिती तशी आहे का? गेल्या दोन महिण्यापुर्वी सभागृहात विषय बोललो होतो. कपात करा. अधिकारी यांना केबीन ऐसी, गाडया या गरजेच्या आहेत का? ड वर्ग प्रमाणे बरोबर आहे का? सभागृहाने सांगीतले होते की, सर्व उपआयुक्त वसुलीला पाठविण्यात यावे. प्रशासन शासनाकडुन आलेल्या अधिकारी/उपआयुक्त यांना रूजु करून घेत आहे. तो खर्च महानगरपालिकेवर वाढत आहे तो गरजेचा आहे का. आकृतिबंदप्रमाणे क प्रमाणे अधिकारी गरजेचे आहे का. ड वर्ग महानगरपालिकेप्रमाणे किती इंजिनिअर, डेप्युटी इंजिनिअर, उपआयुक्त असले पाहिजे. माहिती देण्यात यावे. महानगरपालिकेमध्ये पैसे यायला पाहिजे की, जायला पाहिजे, वाढयला पाहिजे काय चालले आहे. शासनाचे सहा.आयुक्त उपआयुक्त आलेले आहेत ते महानगरपालिकेला गरजेचे आहेत का? ड प्रमाणे एवढे उपआयुक्त लागतात का? अस्थापना अधिकारी यांनी आकृतिबंदप्रमाणे किती अधिकारी/ कर्मचारी पाहिजे खुलासा करण्यात यावा. किती कार्यकारी अभियंता, उपअभियंता पाहीजे. नगरसेवकांना उथळमाथ्याने फिरणे मुश्किल झालेले आहे. मनमानी कारभार चाललेला आहे. नियोजन काही आहे की, नाही. शासन अधिकारी पाठवु लागले आहे आणि महानगरपालिका रूजू करून घेत आहे. एका अधिकारी मागे दहा दहा कर्मचारी सुख सुविधा काय चालले आहे महानगरपालिकेमध्ये.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ज्यावेळेस तीन उपआयुक्त होते त्यावेळी मा.आयुक्तांना डोके फोडण्याची वेळ नव्हती. दहा उपआयुक्त येवुनही कामे होत नाही.

श्री.मधुकर सावंत : अधिकारी यांना सुविधा देणे महापालिकेला गरजेच्या आहेत का. दहा दहा कर्मचारी कशासाठी पाहिजेत. आकृतिबंद प्रमाणे महानगरपालिकेत उपआयुक्त किती असायला पाहिजे,डेप्युटी इंजिनिअर,ज्युनिअर इंजिनिअर, कार्यकारी अभियंता किती असायला पाहिजे. अस्थापना अधिकारी यांनी खुलासा करावा.

अस्थापना अधिकारी-1 : सन 2006 चा शासनाचा ड वर्ग महापालिकेसाठी आकृतिबंद तयार केलेला आहे. त्या आकृतिबंद प्रमाणे 4 डेप्युटी इंजिनिअर आणि 1 वॉटरवर्कसाठी असे 5 डेप्टी इंजिनिअर , शहर अभियंता यांचे 1 पद 10,000 ते 16500. उपआयुक्तांची 2 पदे आहेत. सहाय्यक आयुक्त 2 पदे आहेत. महानगरपालिकेत जे मुंजूर पदे आहेत ती हा जी.आर निघण्याच्या पुर्वीची आहेत. ते हि लिहलेले आहे की, ते करटेल करता येणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : Excess किती आहेत.

श्री.मधुकर सावंत : आज उपआयुक्तांची पदे किती आहेत.

अस्थापना अधिकारी : आज रोजी 4 उपआयुक्त महानगरपालिकेत आहेत.

श्री.मधुकर सावंत : डेप्युटी इंजिनिअर किती आहेत.

अस्थापना अधिकारी : 20.

श्री.मधुकर सावंत : ज्या ठिकाणी 4 पाहिजेत त्या ठिकाणी 20 आहेत. ज्युनिअर इंजिनिअर नियमाप्रमाणे किती पाहिजेत.

अस्थापना अधिकारी : महानगरपालिकेत 68 ज्युनिअर इंजिनिअर आहेत. आकृतिबंदमध्ये दिलेले नाही फक्त अधिकारी याचे दिलेले आहे.

श्री.मधुकर सावंत : आकृतिबंद प्रमाणे बरोबर आहेत का?

अस्थापना अधिकारी : जास्त आहे.

श्री.मधुकर सावंत : आकृतिबंध प्रमाणे महानगरपालिकेत अधिकारी आहे का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार : तिजोरीमध्ये 138 शिल्लक जास्त कशामुळे आहे.

श्री.मधुकर सावंत : पांढरे हत्ती पोसण्याचे कारण काय आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : लेखा विभागात 138 कोटी शिल्लक असल्यामुळे एवढे अधिकारी काम करीत आहे.

श्री.मधुकर सावंत : कशामुळे हे सर्व करीत आहे. काय गरज आहे हे करण्याची. महानगरपालिकेचा एका उपआयुक्तावर किती खर्च आहे. एका सहाय्यक आयुक्तांवर एक लाख रूपये खर्च होत आहे. हा नाहक खर्च कशासाठी करण्यात येत आहे. सभागृहात मुद्दां मांडला होता की, जो वेस्टेज खर्च होत आहे तो थांबविण्यात यावा परंतु त्यावर काहीही निर्णय झालेला नाही. महानगरपालिकेची सध्याची आर्थिक स्थिती खराब आहे. पांढरे हत्ती कशासाठी पोसत आहे. माझ्यामते एका उपआयुक्तावर एक लाखरूपये खर्च करीत आहे. कुठल्याही महापालिकेत अकॉंऊट ऑफिसरला एसी नाही. परंतु महानगरपालिकेत अकौंट ऑफिसरला एसी आहे. गाड्या आहेत, ड्रायव्हर आहे. मा.आयुक्त म्हणतात हतबल झालेलो आहे मग आम्ही कुणाला सांगायचे.

मा.सभापती : मा.सर्वसाधारण सभेने ठरविल्याप्रमाणे दोन उपआयुक्त महानगरपालिकेचे आणि दोन उपआयक्त शासनाचे या प्रमाणे. जे बाकीचे जास्तीचे अधिकारी आलेले आहेत त्यांना परत पाठविण्यात यावे. महानगरपालिकेचे दोन उपआयुक्त नेमण्यात यावे. जो अनाठायी खर्च होत आहे त्याबाबतीत मा.आयुक्तांनी स्वतःच चिंतन करावे आणि यावर कुठला रामबाण उपाय करता येईल तो करावा. मा.आयुक्तांना मनपाचे उत्पन्न वाढावे हे जरी वाटत असले तरी इतर अधिकारी यांना जोपर्यत वाटत नाही तो पर्यत काहीही होणार नाही. मा.आयुक्तांना विनंती आहे की, स्वतःच चिंतन करावे कोण अधिकारी मीसगाईड करत आहे चुकीची माहिती देत आहे. त्यांचेपासून सावध रहावे व योग्य तो निर्णय घेण्यात यावा. पुढील बैठकीत तीन कार्यकारी अभियंता यांचे ज्या बदल्या केल्या आहेत. त्यांचा वसुलीचा अहवाल रोजच्या रोज पदाधिकारी यांचेकडे आला पाहिजे. इतर अधिकारी यांनाही वसुलीवर लावण्यात यावे. मोठ मोठया थकबाकीदारांकडे खालच्या स्तरावरील कर्मचारी यांना न पाठवता अधिकारी यांनी स्वतः जावुन वसुलीसाठी प्रयत्न करावे. वसुलीचे खाजगीकरणा संदर्भात विचार करणेसाठी अधिकारी आणि पदाधिकारी यांनी एक बैठक घेण्यात यावी. वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात यावी की, थकबाकीदारांनी त्वरीत थकबाकी अदा करण्यात यावी नसता

कार्यवाही करण्यात येईल. जे अधिकारी बदलण्यात आलेले आहे ते थांबविण्यात यावे. पाणी सोडणाऱ्या, झाडु मारणाऱ्यापासून ते इस्टीमेट तयार करणारे यांचे बदल्या करून काही उपयोग नाही जशीच्या तशी राहु द्या. प्रशासनाला काही बदल करायचे असल्यास त्यांचे लेवलवर बदली करण्यात यावी. याचेशी रोजचे नगरसेवक नागरीकांशी कामे असतात. अधिकारी यांची बदली करतांना शक्य तो नगरसेवकांना वॉर्ड अधिकारी यांना विश्वासात घेऊन बदली करण्यात यावी. नगर रचना विभागातील 12 अधिकारी/ कर्मचारी यांना मालमत्ता वसुलीचे काम न देता पुन्हा नगर रचना विभागात कायम ठेवावे.

श्री.अमित भुईगळ : यापुर्वी स्थायी समितीमध्ये रूलिंग देण्यात आलेले आहे परंतु प्रशासनाने किती रूलिंगवर अंमलबजावणी केली आहे.. सभागृहात रूलिंग दिली जाते परंतु सभा संपल्यास त्यावर कुठलीच कार्यवाही होत नाही. परत दुसऱ्या मिटींगमध्ये येतो. आता आपण सांगीतल्यानुसार दोन उपआयुक्त शासनाकडे परत केव्हा पाठविण्यात येणार आहे याची माहिती मा.आयुक्तांनी देण्यात यावी.

श्री.नासेर खान : मा.आयुक्तांना याची माहिती आहे की, कोण मीसगाईड करतो दिशाभुल करतो. विस दिवसांपुर्वी श्री.नाईकवाडे यांना एक काम सांगीतले होते. ते काम करण्यात आले नाही. चिंतन करण्याची काय गरज.

मा.सभापती : जे अधिकारी काम ऐकत नाही त्यांना शासन सेवेत परत पाठविण्यात यावे.

श्री.नासेर खान : मा.आयुक्तांनी सांगीतल्यानंतरही काम होत नाही पोलिसांकडे गेल्यावर त्यांचीही दिशाभुल केली जाते.

मा.सभापती : वर्ग तीन व चारच्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यापेक्षा जे अधिकारी मा.आयुक्तांचे ऐकत नाही त्यांच्या विरूध्द कार्यवाही करण्यात यावी सर्व नगरसेवक मा.आयुक्तांच्या बाजूने उभे राहतील.

श्री.नासेर खान : मा.आयुक्तांनी सांगीतल्यानंतरही ऐकले जात नाही. तर नगरसेवकांचे व इतरांचे कसे ऐकतील.

मा.सभापती : ही बाब अत्यंत गंभीर आहे. प्रशासनाचे हेड मा.आयुक्त आहे त्यांचे अधिकारी जर ऐकत नसेल तर योग्य नाही. प्रत्येक मंगळवारी स्थायी समितीची बैठक आयोजित करण्यात येणार आहे व मागील बैठकीतील अहवाल येणाऱ्या बैठकीत घेतला जाणार आहे.

श्री.विकास जैन : पैसे भरा म्हणुन सांगण्यात यावे.

श्री.मधुकर सावंत : शाळा बंद पडत आहे. नगरसेवकांचे लक्तरे काढत आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर : मा.आयुक्तांनी आठ दिवसापुर्वी आदेश दिले होते.

मा.आयुक्त : पैसे का देण्यात आले नाही.

प्र.शिक्षणाधिकारी : प्रियदर्शनी भागातील शाळा इमारत भाडयाने घेतली आहे भाडे ठरविण्यासाठी मालमत्ता विभागाकडे शिक्षण विभागातुन जवळपास दिड महिण्यापुर्वी संचिका सादर केली होती. सध्या ती संचिका वार्ड अधिकारी यांचेकडे गेलेली आहे. वार्ड अधिकाऱ्याकडुन संचिका अद्याप प्राप्त झालेली नाही. पाठपुरावा सुरू आहे एक दोन दिवसांत पेमेंट मंजूर करू. भाडे

समितीपुढे ठेवणे गरजेचे आहे त्यामुळे संचिका पाठविण्यात आली.

मालमत्ता अधिकारी : माझ्याकडे संचिका एक वर्षानंतर प्राप्त झाली होती. केवळ श्री.जावरे साहेबांमुळे संचिकेचा शोध लागला. साधारणतः नवव्या महिण्यात शोध लागल्यानंतर 15 दिवसांपुर्वी मालमत्ता विभागास संचिका प्राप्त झाली. संचिका आल्यानंतर भाडे निश्चितीसाठी कार्यवाही केली. भाडेनिश्चिती करून ADTP यांचेकडे संचिका पाठवली असता त्यांनी सांगीतले की, भाडेनिश्चिती चुकलेली आहे सुधारणा करून पाठविण्यात यावी. सुधारणा करून परत पाठविण्यात आलेली आहे.

श्री.अमित भुईगळ : नेहरू भवनची रूलिंग मागच्या बैठकीत देण्यात आली होती. त्या रूलिंगचा कारणापुरता उतारा आजपर्यंत मालमत्ता विभागास मिळालेला नाही.

मालमत्ता विभाग : चार तारखेला संध्याकाळच्या सुमारास कारणापुरता उतारा प्राप्त झालेला आहे. त्यानुषंगाने कार्यवाही होईल.

मा.आयुक्त : शाळेचे भाडे तीन दिवसात देण्याची व्यवस्था होईल. संबधीताने याची नोंद घ्यावी काही अडचण झाली माझ्याशी तातडीने संपर्क करावा. तीन दिवसात भाडे दिले जाईल, असे पहावे.

श्री.विकास जैन : मा.आयुक्तांच्या कॅबिनमध्ये अधिकारी यांना कुठलातरी वेळ ठरवला पाहिजे

श्री.रेणुकादास वैद्य : 3 ते 5 नागरीकांसाठी, नगरसेवकांसाठी संध्याकाळी 5 नंतर बैठकीचे आयोजन करण्यात यावे.

मा.आयुक्त : सर्व सांगीतलेले आहे . सुरवात झालेली आहे. आठ दिवसांपुर्वी सूचना दिलेल्या आहे 3 ते 6 सर्व अधिकारी.

श्री.रेणुकादास वैद्य : माझी विनंती आहे. लक्ष द्या जो कुणी हजर नाही त्यांना शोकॉज नोटीस द्यावी.

मा.आयुक्त : आमच्या बैठका सकाळी होतील किंवा संध्याकाळी घेण्यात येतील.

श्री.विकास जैन : प्रशासनातील एखादा कर्मचारी गुपित राहुत हजेरी घेण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : खाम नदी पात्रात महानगरपालिकेच्या मालकीची 7 एकर जागा आहे. या महानगरपालिकेच्या जागेवर जिल्हाधिकारी यांची खोटी सही करून अन्वर कादरी व सांडु धोंडिबा दुबे यांनी सर्वे नंबर 19/1 मध्ये 7 एकर जमीन महानगरपालिकेची विक्री केली. या बाबत मी महानगरपालिकेचे सहाय्यक संचालक नगर रचना श्री.डी.पी.कुलकर्णी साहेब यांना दिनांक 18.10.2010 रोजी एक पत्र दिले. श्री.डि.पी.कुलकर्णी साहेब यांनी दुसऱ्या दिवशी लगेच पत्र दिले. ही जमीन ग्रीनबेल्टची असल्यामुळे तीथे प्लॉटिंग होऊ शकत नाही आणि जे संबधीताने खोटे पत्र तयार केलेले आहे ते महानगरपालिकेचे नाही. मा.सभापती पान क्रमांक 1 तुमच्या समोर आहे. कलेक्टरने ओरिजनल एन.ए. इश्यु केलेले आहे ते अब्दुल गणी अब्दुल रहेमान पटेल यांचे नावांवर आहे. मागच्या वेळेस मी तेथील नगरसेवक होतो बनेवाडीचा एन.ए. आहे. एन.ए. चा क्रमांक 147/9 दिनांक 22.12.2009. बनेवाडीचा एन.ए. जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी दिला होता. त्यानंतर अन्वर कादरी, सांडु धोडिंबा दुबे आणि काही लोकांनी महानगरपालिकेचा एडीटीपी सेक्शनला खोटा एन.ए. तयार केले. त्याबाबत डि.पी.कुलकर्णी साहेबांचे पत्र आहे. पत्र

क्रमांक मनपा/नरवि/3/99-2000 दिनांक 19.10.2010. त्यानंतर खरेदी खत लावलेले आहे. ते खरेदी खत कादरी अन्वर अहेमद जहूर अहेमद यांचे नांवावर आहे आणि विकणारा आहे सांडु धोडिंबा दुबे. खरेदी खत सोबत सांडु धोडिंबा दुबेच्या नावांवर बोगस एन.ए. तयार केले. बोगस एन.ए. टाकुण तोच नंबर टाकण्यात आला, तीच तारीख टाकण्यात आली. दिनांक 22.12.2009 फक्त बनेवाडीचा हिमायतनगर. पेज नबर 02 वर सहाय्यक संचालक नगर रचना औरंगाबाद यांचे पत्र क्रमांक भुमिअभिलेख सर्वे नं.19/1 मौजे हिमायतनगर, तालुका औरंगाबाद दिनांक 09.06.2010 अटी व शर्तीच्या बंधनकारक राहील. एन.ए. सन 2009 मध्ये महानगरपालिकेचे सहाय्यक संचालक यांचे पत्रावर दिनांक टाकण्यात आली 09.06.2010 असे होऊ शकत नाही. एन ओ सी अगोदर महानगरपालिकेची एन ओ सी घ्यावी लागते. हा जो एन.ए. आहे तो खोटा आहे. एन.ए.च्या आधारे महानगरपालिकेची 7 एकर जमीन आता विकली. 115 प्लॉट पाडुन महानगरपालिकेच्या 115 रजिष्ट्री केल्यात. नकाशा सोबत जोडण्यात आला आहे. जे खरेदी खत करीत आहे ते पान क्रमांक 3 वर आहे. त्याबाबत दिनांक 12.10.2010 रोजी श्री.झनझन साहेबांकडे तक्रार केली होती. दिनांक 12.10.2010 रोजी इमारत निरीक्षक श्री.संगेवार आणि श्री.झनझन साहेबांनी कार्यवाही केली होती. शेड टाकत होते ते शेड भरुन आणुन महानगरपालिकेत जमा केले. त्यानंतर महानगरपालिकेची जी जमीन विकत आहे. यासाठी मा.आयुक्तांना पत्र दिले आहे. प्रशासकीय अधिकारी यांना पत्र दिले सगळयांना पत्र दिले. परंतु अद्यापपर्यंत त्यांचेविरूध्द गुन्हा दाखल झालेला नाही. खोटे कागदपत्र तयार करून खोटे एन.ए. तयार केले. टि.पी. सेक्शनकडुन खुलासा घेण्यात यावा की, दि.19.10.2010 चे पत्र त्यांनी दिलेले आहे का? जमीन ग्रीनबेल्टमध्ये आहे का? जी जमीन ग्रीनबेल्टमध्ये असती तीथे प्लॉट पाडुन विक्री करू शकत नाही. हे नियम विचारावे. परंतु ग्रीनबेल्टमध्ये त्यांनी 10 गुंठे जमीन खरेदी केली आणि महानगरपालिकेची 7 एकर जमीन, अशी 7 एकर 10 गुंठे जमीन विकुण टाकली. 6 व्या महिन्यात 7 व्या महिन्यात 8 व्या महिन्यात सर्व विक्री झालेली आहे. रजिष्ट्री झालेली आहे. खोटे एन.ए. तयार करून टि.पी. सेक्शनला पत्र देवुन प्रशासकीय विभागाला पत्र देवुन आत्तापर्यंत गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. कालपासुन पुन्हा तिथे अतिक्रमण सुरू झाले होते. श्री.झनझन साहेबांना फोन केल्यावर त्यांनी जप्त करून आणले. अगोदर ADTP यांचेकडून खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता-न.र.(श्री.खन्ना) : जो मुद्दा उपस्थित झाला त्याप्रमाणे जे पत्र नमुद केलेले आहे ते पत्र महानगरपालिकेकडून देण्यात आलेले नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : म्हणजे त्यांनी महानगरपालिकेचे सहाय्यक संचालक नगर रचना यांची खोटी सही करून खोटे पत्र तयार करून रजिष्ट्रीला लावुन महापालिकेची जमीन विकली. जे विकणारे आहे सांडु धोडिंबा दुबे आणि घेणारे कादरी अन्वर

अहेमद जहूर अहमद यांचे विरूध्द सर्व कागदपत्र दिलेले आहेत. ADTP यांचे पत्र आहे. संबधीत सिटी चौक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची तात्काळ कार्यवाही दाखल करावी आणि महानगरपालिकेच्या जागेवर मनपाच्या नावाचा बोर्ड लावण्यात यावा. जी रजिष्ट्री झालेली आहे ती आपल्या हद्दीमध्ये झालेली आहे. खोटे जे पत्र तयार केलेले आहे ते सिटी चौक पोलीस स्टेशन हद्दीमध्ये आहे. गुन्हा आजच्या आज दाखल करण्यात यावा. कारण जमीन 30 कोटी रूपयांची, 7 एकर जमीन ऑलरेडी घेतलेली आहे. मा.आयुक्त साहेबांना 29.09.2010 रोजी पत्र दिले. त्यानंतर 30.11.2010 रोजी पत्र दिले. 03 तारखेला पत्र देऊनही अद्याप कार्यवाही झालेली नाही. महानगरपालिकेचे जमीनीचे प्रकरण आहे. त्यांनी 30 कोटी मध्ये 7 एकर जमीनीवर 115 रजिष्ट्री आहे, माझ्याकडे आहे. आजच्या आज सिटी चौक पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात यावे.

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी खुलासा केला आहे की, हे पत्र आपल्याकडुन गेलेले नाही. याचा अर्थ बोगस पत्र आहे, खोटे आहे. स.सदस्यांने जे पत्र दिले आहे ते तपासले आहे का?

उपअभियंता (श्री.खन्ना) : त्या तारखेला पत्र दिलेले नाही.

मा.सभापती : आपण दिलेले नाही म्हणुन पत्र तपासले आहे का?

उपअभियंता (श्री.खन्ना) : जे पत्र नमुद केलेले आहे ते आपण दिलेले नाही, त्या तारखेला.

मा.सभापती : त्यावर आत्तापर्यंत काय कार्यवाही केली. महानगरपालिकेची 7 एकर जमीन खाम नदिच्या पात्रातील एखादा व्यक्ती विकत असेल आणि तुम्ही त्यावर काही कार्यवाही करत नसेल व ते एन.ए. ले आउट करून विकत असेल, महानगरपालिकेचे बोगस सर्टीफिकेट किंवा परमिशन दाखवुन करत असेल व माहिती देऊनही कार्यवाही करत नसेल तर कोण करणार यावर कार्यवाही. यावर कोणती कार्यवाही केली.

उपअभियंता (श्री.खन्ना) : त्यांना कळविले आहे.

मा.सभापती : कोणाला कळविले आहे. तुम्ही कोणाला कळविले हे सभागृहाला उत्तर अपेक्षित आहे. कारण तुमच्याकडे माहिती दिल्यानंतर तुमचे काम आहे की, महानगरपालिकेची करोडो रूपयांची जमीन एखादा खाजगी माणुस विकुन खात असेल, महानगरपालिकेचे करोडो रूपयांचे नुकसान होत असेल तर तुम्ही काय कार्यवाही केली यावर.

उपअभियंता (श्री.खन्ना) : प्रशासकीय अधिकारी यांचेकडुन कार्यवाही चालु आहे. त्यांची जी संचिका उपलब्ध आहे.

मा.सभापती : कार्यवाही चालु आहे हे सांगु नये, काय कार्यवाही केली ते सांगण्यात यावे. प्लॉटिंग चालु असतांना बांधकाम बंद केले, कलेक्टर ऑफिसला कळविले, पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविण्यात आली. संबधीत अधिकारी तसेच मा.आयुक्तांना तसे कळविले आहे का? माहिती देऊनही कार्यवाही करत नसेल तर काय करायचे.

उपअभियंता (श्री.खन्ना) : प्रशासकीय विभागाची जी संचिका होती त्यात कार्यवाही करणे संबधात त्यांना.

मा.सभापती : मा.आयुक्त साहेब, ताबडतोब आताच्या आता ज्या कुणी अधिकारी यांनी यात हयगय केलेली आहे. त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी आणि संबधीत जे महानगरपालिकेचे प्लॉट पाडून विकत आहे, त्यांचेवर आजच्या आज पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात यावा. त्या ठिकाणी जे बांधकाम चालु असेल ते ताबडतोब बंद करण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : गुन्हा कोण दाखल करणार.

मा.सभापती : महानगरपालिकेचे संबधीत अधिकारी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : संबधीत अधिकारी कोण जाणार.

मा.सभापती : जो अधिकारी सेक्शनच्या संबधीत असेल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सहाय्यक संचालक नगर रचना यांचे खोटे पत्र दाखविलेले आहे आणि महानगरपालिकेने एन.ए. ले आऊट दिलेले आहे. असे लोकांना पत्र दाखवुन त्यांनी 115 प्लॉटची विक्री केलेली आहे. हे प्रकरण 9 व्या महिण्यात झालेले आहे आत्तापर्यंत आपणांकडून गुन्हा दाखल नाही.

मा.सभापती : ज्या ज्या लोकांची फसवणुक झालेली आहे ती पेपरमध्ये जाहिरात देण्यात यावी. जाहिर प्रगटन देण्यात यावे.

मा.आयुक्त : ADTP यांनी जाऊन केस दाखल करावी.

मा.सभापती : आजच्या आज संबधीतावर गुन्हा दाखल करण्यात यावा.

मा.आयुक्त : 24 तासाच्या आत गुन्हा दाखल करावा त्याची प्रत.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेऊन त्यावर महानगरपालिकेचा बोर्ड लावण्यात यावा. तार फेंसींग करावी. त्याने जमीन लेवल करून 115 प्लॉट विकुण टाकण्यात आले आहे. आपल्याला लेवल करायची गरज नाही.

मा.सभापती : संबधीत इमारत निरीक्षक यांना सभागृत बोलविण्यात यावे. त्यांच्या हद्दीमध्ये मनपाची जमीन, ले-आऊट होते. प्लॉटींग होते त्याकडे लक्ष देत नसेल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : काल त्या ठिकाणी शेड बांधण्याचे काम चालु होते. श्री.झनझन साहेबांना फोन केला, त्यांनी बिल्डींग इन्स्पेक्टरला श्री. शेखला त्या ठिकाणी पाठविले. त्याने 50 लोक त्या ठिकाणी जमा केले. आपल्या बिल्डींग इन्स्पेक्टरची व्हिडिओ शुटिंग केली. ओळखपत्र कुठे आहे, कोणी अधिकार दिले, दमदाटी करून हाकलुन दिले. इमारत निरीक्षकाला सांगीतले आजच्या आज गुन्हा दाखल करा, रविवार होता. आत्तापर्यंत गुन्हा दाखल झाला नाही. महानगरपालिकेची जमीन कुणी विक्री करत असेल.

मा.सभापती : महानगरपालिकेची जमीन आणि महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्याला विचारत असेल तु कोण आहे, ओळखपत्र मागत असेल तर अशावर गुन्हा दाखल झालाच पाहिजे.

प्र.प्रशासकीय अधिकारी : हि तक्रार आल्यानंतर त्यापुर्वीच इमारत निरीक्षक अन्वर खान होते त्याचेकडून दखल झाली नव्हती. म्हणुन त्यांचे जागी बदलुन श्री.संगेवार यांना दिले होते. श्री.संगेवार यांनी संबधीताचे पुर्ण शेड जप्त करून तोडुन मनपामध्ये जमा केलेले आहे.

मा.सभापती : यातुन प्रश्न सुटणार आहे का? संबधीताने त्या ठिकाणी प्लॉट विकले. त्याचे

काय करणार.

प्रशासकीय अधिकारी : प्लॉटचे डॉक्युमेंट आपल्याकडे घेऊन आजच सकाळी त्यांचेवर एफआयआर दाखल करा म्हणुन लेखी आदेश दिलेले आहे. बी.आय. स्वत: संध्याकाळी पाच वाजेपुर्वी एफआयआर होणार आहे. ज्यांचे ज्यांचे विकलेले आहे ते डॉक्युमेंटस् येणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : 5 वाजले आहे बी.आय. ला फोन लावण्यात यावे. 15 मिनट बाकी आहे पोलीस स्टेशनला पोहचले की नाही फोन लावण्यात यावा.

श्री.विकास जैन : इमारत निरीक्षक का बदलण्यात आला.

प्रशासकीय अधिकारी : संबधीत इमारत निरीक्षक यांनी जी तक्रार आली होती त्याची दखल न घेतल्यामुळे इमारत निरीक्षक बदलण्यात आले आहे.

मा.सभापती : इमारत निरीक्षक यांचे काम आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : आपली जमीन विकणारे लोक आपल्यावर दादागिरी करत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : पोलीस स्टेशनमध्ये फोन लावण्यात यावा.

श्री.अमित भुईगळ : इमारत निरीक्षक श्री.शेख यास सभागृहात बोलविण्यात यावे.

प्रशाकीय अधिकारी : 100 टक्के 5 वाजल्यापुर्वी एफआयआर दाखल होईल.

श्री.अमित भुईगळ : श्री.शेख यांना बोलविण्यात यावे. फोन लावण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सभागृहात श्री.शेख यांना बोलविण्यात यावे.

श्री.अमित भुईगळ : सभागृहात बोलविण्यात यावे.

मा.सभापती : त्यांना बदलुन प्रॉब्लम सॉल होतो का? प्लॉटिंग झाली महानगरपालिकेची मालमत्ता विकुण टाकली. त्यास जबाबदार कोण आहे.

प्रशासकीय अधिकारी : महानगरपालिकेची जी प्लॉटींग पाडली होती ती.

मा.सभापती : संबधीत इमारत निरीक्षकास सभागृहात बोलविण्यात यावे.

श्री.विकास जैन : प्रशासनाच्या मते तो इमारत निरीक्षक ऐकत नव्हता संबधीत इमारत निरीक्षकास सभागृहात बोलविण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : महानगरपालिकेच्या हिताचा प्रश्न आहे. सगळ्यांना बोलवा.

श्री.अमित भुईगळ : श्री.शेख इमारत निरीक्षक यास तात्काळ सभागृहात बोलविण्यात यावे. त्यांचा खुलासा घेण्यात यावा.

मा.सभापती : श्री.शेख यांना सभागृहात बोलविण्यात यावे.

श्री.अमित भुईगळ : मा.आयुक्त, श्री.शेख इमारत निरीक्षक यांना सभागृहात बोलविण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : जोपर्यंत श्री.अन्वर तीथे होते तो पर्यंत शेड जप्त करून पाडण्याची हिम्मत दाखवली नाही. श्री.संगेवार यांनी बरोबर कार्यवाही केलेली आहे. श्री.झनझन साहेबांनीही कार्यवाही केलेली आहे पण श्री.शेखला कार्यवाही जमणार नाही. एक तर श्री.संगेवार यांची नियुक्ती करा. श्री.अन्वरची करा आणि त्याचे अगेन्स्ट गुन्हा दाखल करा.

मा.सभापती : गुन्हा आजच्या आज दाखल करण्याचे सांगीतले आहे. अधिकाऱ्यांनी फोन लावुन विचारणा करण्यात यावी की अधिकारी आहे का तिथे.

श्री.अमित भुईगळ : इमारत निरीक्षक यास सर्वप्रथम या ठिकाणी बोलविण्यात यावे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : महानगरपालिकेची 7 एकर जागा आहे.

मा.सभापती : एक प्रशासकीयच्या वतीने गुन्हा दाखल करा, एक टाउन प्लॅनिंगच्या वतीने गुन्हा दाखल करा. खोटया सहया करून टाउन प्लॅनिंगची फसवणुक केली महानगरपालिकेची फसवणुक केली. आपल्या अधिकाऱ्यांना दमदाटी केली म्हणुन तो एक गुन्हा दाखल करण्यात यावा. गुन्हा दाखल झाला आहे का नाही ते बघुन घेण्यात यावे. नगर रचना विभागातर्फे गुन्हा कोण दाखल करणार आहे केव्हा करणार आहे, खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : अजुन पर्यंत गेलेले नाही.

उपअभियंता (श्री.खन्ना) : 24 तासात करण्यात येईल.

मा.सभापती : स्थगिती मिळेल याची संधी मिळू नये.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : श्री.डि.पी.कुलकर्णी साहेबांनी मला पत्र दिलेले आहे. गुन्हा दाखल करण्यास काय अडचण आहे. कशाला 24 तास पाहीजे. 10 व्या महिण्यात पत्र दिलेले आहे. टि.पी.सेक्शनने पत्र दिल्यावर काय कार्यवाही केली. हे पत्र मनपाने निर्गमित केलेले नाही.

श्री.अमित भुईगळ : श्री.शेख त्या ठिकाणी गेलेले नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : कोठे जायचे कारण नाही. वाटाघाटी करित असेल.

मा.आयुक्त : सदरील एरीयाच्या उपअभियंता यांनी गुन्हा ताबडतोब दाखल करावा. येथून लगेच निघावे. फोर्जरी आहे. 420 चे आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : आत्ताच्या आता जाऊन गुन्हा दाखल करण्यात यावा.

मा.सभापती : गुन्हा आत्ताच्या आता जाऊन दाखल करण्यात यावा.

श्री.अमित भुईगळ : प्रशासकीय अधिकारी यांना आदेशीत करण्यात यावे की, संबधीत इमारत निरीक्षकास सभागृहात बोलवावे.

मा.सभापती : गुन्हा दाखल करतांना मनपाची मालमत्ता केवढ्याची, याचा त्यात उल्लेख करावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : सभागृहातुन जाण्याचा तात्काळ आदेश देण्यात यावा.

मा.सभापती : या प्रकरणात चौकशीही झाली पाहिजे. यामध्ये कोण दोषी आहे हे आढळले पाहिजे. चौकशी समिती स्थापन करण्यात येत असुन यामध्ये मुख्यलेखापरिक्षक, मुख्यलेखाधिकारी, शहर अभियंता, उपआयुक्त, प्रशासकीय अधिकारी, मालमत्ता अधिकारी, स्थायी समितीचे मेंबर यामध्ये श्री.अमित भुईगळ, श्री.अ.साजेद अ.सत्तार, श्री.जुबेर गाझी असीर अहमद आणि श्री.जगदीश सिध्द.

श्री.अमित भुईगळ : सबधीत इमारत निरीक्षकास सभागृहामध्ये का बोलविण्यात येत नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : या प्रकरणी दैनिक सामना आणि लोकमत वर्तमान पत्रात बातमी आलेली आहे. आजच्या आज.

श्री.विजय वाघचौरे : विषय पत्रिकेस सुरूवात करण्यात यावी.

श्री.अमित भुईगळ : अजुनपर्यंत एकही अहवाल आला नाही. मा.आयुक्त आणि सर्व प्रशासन हे सर्व हतबल झालेले आहे. मा.सभापती साहेबांनी रूलिंग दिले होते मा.आयुक्त साहेबांचे कोणतेही अधिकारी ऐकत नाही. किती वेळेस मा.आयुक्त आदेश देतात परंतु ऐकत नाही. अधिकारी यांचेवर मा.आयुक्तांचे वचक राहिलेले नाही. त्यामुळे आजची हि सभा मी त्याग करतो आणि या सभेचा निषेध व्यक्त करतो आणि निघुन जातो.

मा.आयुक्त : आयुक्त अजिबात हतबल झालेले नाही. आयुक्तांनी कार्यवाही केलेली आहे. 100 ते 150 कर्मचारी निलंबीत केलेले आहे. अजुनही काही जण निलंबीत आहे.

श्री.अमित भुईगळ : निलंबीत केल्याने काहीही होत नाही.

(याचवेळी स.स.श्री.अमित भुईगळ सभागृह सोडुन बाहेर जातात.)

श्री.मधुकर सावंत : मालमत्ता विभाग हा सर्व विभांगामध्ये सक्षम पाहिजे. महानगरपालिकेच्या सर्व मालमत्तांची जबाबदारी मालमत्ता विभांगाची असते. महापालिकेचे दुर्देव आहे की, सेदैव आहे हे मला सांगता येणार नाही पण महानगरपालिकेचा मालमत्ता विभाग अतिशय सक्षम असायला पाहिजे. नविन अधिकारी यांचा त्यात दोष नाही कारण त्यांना काही माहित नाही. कारण सक्षम यासाठी म्हणतो की, महानगरपालिकेची हि बिल्डींग तरी महानगरपालिकेच्या नावांवर आहे काय? महानगरपालिकेच्या 150 एकर जमीन आहे. 150 एकर जमीनीचा काही ताळमेळ लागत नाही. उदाहरणार्थ जाफरगेट येथील 5 एकर 35 गुंठे जमीन मनपाची होती. ज्या मालमत्तावर आपले नांव होते त्या मालमत्ता काही लोकांनी खाजगी नावाने पी.आर कार्ड तयार केले. मालमत्ता विभाग टाउन प्लॅनिंगला पत्र पाठवुन विचारणा करतो की, हि मालमत्ता मनपाची आहे का म्हणुन प्रश्न विचारले जाते. दुर्देव असे की, मनपाचा मालमत्ता विभागातील लिपीक त्या सर्व केसेस अटेंड करतो. दहा ते विस हजार रूपये द्या तुमच्या बाजुने निकाल लागतो. माझ्या वार्डातीन 5 एकर जागेमध्ये ओपन स्पेस असुन त्यामध्ये आपल्या नावांवर रजिष्ट्री करून दिलेली आहे पी.आर कार्ड आपल्या नावांवर होते. मालमत्ता विभागातील कर्मचारी त्यास मॅनेज करा. निकाल त्यांचे बाजुने लावुन देतो. मनपाच्या मालमत्तांची विल्हेवाट सर्रास लावण्यात आलेली आहे. बाबा हरदास नगर मधील मालमत्ता ओपन स्पेस महापालिकेला दिलेली आहे म्हणुन वेळोवेळी बोललेलो आहे. 100 पत्र दिलेली आहेत. तो व्यक्ती 55 लाखांचा व्यवहार करायला लागला आहे. मालमत्ता विभागातील लिपीक यास 30 हजार रूपये देवुन निकाल विरोधात गेलेला आहे. विधी विभागाचा/कायदेशीर कुणीही तीथे हजर राहत नाही. सदरील लिपीक तीथे राहतो. कुठलीही मालमत्ता ही मॅनेज करून नावांवर होते. महानगरपालिकेचा मालमत्ता विभाग हा अकार्यक्षम झालेला आहे. वर्षानु वर्ष त्या ठिकाणी आहे ते स्ट्राँग झालेले आहे. चपराशी ते लिपीक यांचे लाखोंच्या करोडोच्या मालमत्ता आहेत. नविन अधिकारी आलेले आहे त्यांचा दोष नाही. अनेक वर्षापासुन मालमत्ता विभाग अकार्यक्षम झालेला आहे त्या ठिकाणी काही ताळमेळ लागत नाही. काही सिस्टीम नाही. सभागृहात विचारणा करण्यात यावी. आतापर्यंत महानगरपालिकेचे वेगवेगळे लोकांनी ज्या ठिकाणी पी.आर कार्ड बनते त्या ठिकाणी महापालिकेचे किती जण गेलेले आहे. तो एकमेव लिपीक जातो काही रक्कम देऊन पी.आर कार्ड त्यांचे नांवावर जाते. अनेक वेळा सांगीतले आहे मालमत्ता विभाग सक्षम असला पाहिजे. महापालिकेच्या सर्व प्रॉपर्टी संभाळणारा विभाग आहे. मनपा कर्ज घेण्यास गेली तर कुणी कर्ज द्यायला

तयार होणार नाही. कारण प्रॉपर्टी नावांवर नाही. रोजच वर्तमानपत्रामध्ये येत आहे की, मनपाची आर्थीक स्थिती खराब आहे. दर 15 दिवसाला एक प्रॉपर्टी चाललेली आहे. जाफरगेट येथील बाजाराची 5 एकर जागा मनपाची प्रॉपर्टी आहे. एक लिपीक जातो त्या ठिकाणी उभे राहतो त्याला पैसे द्या, निकाल आपल्या विरूध्द लागतो. प्रशासन काहीच करत नाही. एवढा अकार्यक्षम विभाग झालेला आहे. परवा नविन उपआयुक्त श्री.खांडेकर व मॅडम यांना बोललो मनपाच्या विरोधात दोन केस गेलेल्या आहेत विधी विभागास पाठविण्यात यावे म्हणुन श्री.खांडेकर यांना सांगीतले. त्यांना प्रकरणाची माहिती होत नाही. चारवेळेस फोन लावुन सांगण्यात येते परंतु काहीही कळत नाही. अधिकारी यांना दहा ते पंधरा कर्मचारी काम करणेसाठी, ड्रायव्हर, सर्व सुखसोई लाख दोन लाख रूपये त्यांचेवर खर्च करण्यात येतात त्याचा काहीच उपयोग नाही. जबाबदारीने कुणीही काम करण्यास तयार नाही. माझ्या वार्डातीन जमीनीचा सौदा 55 लाखात झाला त्याचे जाहिर प्रगटन आले. महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाने आक्षेपदेखील घेतला नाही. ओपनस्पेस महानगरपालिकेची आहे. वकील म्हणुन क्लर्क त्या ठिकाणी उभा राहीला. आपल्याला जमाबंदी आयुक्तांकडे जावे लागेल.

मा.सभापती : मालमत्ता विभागातर्फे खुलासा करण्यात यावा. महानगरपालिकेची मालमत्तेचे जाहिर प्रगटन होत असेलतर त्यास आक्षेप घ्यायला पाहिजे. तसा आक्षेप घेतलेला आहे का?

मालमत्ता अधिकारी : जे जे आपल्या लक्षात येते ते ते सभागृहाच्या निर्देशनास

श्री.अ.साजेद अ.सत्तार : एखादे Example द्या. काऊंटर जाहीर प्रगटन देण्यात येते.

श्री.रेणुकादास वैद्य : महानगरपालिकेने दिले.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : महानगरपालिकेची 800 प्रॉपर्टी आहे. त्यावर मालकी हक्क मनपा आहे. एक Example पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य : महानगरपालिकेने ओपनस्पेवर कंपाउड वॉल टाकले मा.सर्वसाधारण सभेने ठराव घेतला की, ही जागा महानगरपालिकेच्या मालकीची आहे. गजानन नगर येथे पुर्वी पासुन महानगरपालिकेची जागा आहे. कुणीतरी डुप्लीकेट पी.आर.कार्ड तयार केले आता कोर्टात केस चालु आहे. 100 पत्र दिलेले आहे.

श्री.मधुकर सावंत : 55 लाखाची जमीन आहे. पी.आर कार्ड मनपाचे आहे. व खाजगी व्यक्ती सर्रास विकत आहे. महानगरपालिकेची प्रॉपर्टी संभाळण्याची जबाबदारी आमच्यावर आहे काय?

श्री.रेणुकादास वैद्य : त्यावर काहीच कार्यवाही झालेली नाही.

श्री.विजय वाघचौरे : माझ्या वार्डात दहा हजार फुटची जागा आहे.

मा.सभापती : महानगरपालिकेची आर्थीक परिस्थिती खराब आहे. महानगरपालिका काम करू शकत नाही. मनपाकडे पैसे नाही परंतु महानगरपालिका आपल्या जागातर सांभाळु शकतात. हे काम प्रशासन करू शकते. प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे. मा.आयुक्तांना असे आदेश द्यायला लावतो की, प्रशासकीय विभाग व मालमत्ता विभागाने मनपाच्या जेवढया मालमत्ता असतील त्याचा

सर्वे करण्यात यावा. मनपाच्या नावावर आहे की नाही याची माहिती घ्यावी. महानगरपालिकेची मालमत्ता म्हणुन नगरसेवकांनी सांगुन प्रशासन कार्यवाही करत नाही. महानगरपालिकेची मालमत्ता आपली मालमत्ता म्हणुन कार्यवाही करा, तर होत नाही. मा.आयुक्तांनी आदेश द्यावे की, शहरातील मनपाच्या मालमत्तांचे सर्वे करण्यात यावे. किती पी.आर.कार्ड नावांवर आहे मालमत्ता कुणाच्या ताब्यात आहे, कोणाचा ताबा असेल, त्यावर किती दिवसात काढणार आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : प्रशासनाकडुन खुलासा घ्यावा की, तत्कालिन आयुक्तांच्या काळात 300 पी.आर.कार्ड तयार झालेले आहे. 800 पी.आर.कार्ड तयार करण्याचे काम चालु होते. माहिती मालमत्ता विभागाकडे उपलब्ध आहे. 1100 प्रॉपर्टी होत्या त्यापैकी आतापर्यंत 400 तयार झाले आहे. माझ्याकडे कॅसेट व प्रींटही उपलब्ध आहे. त्यानंतर 4 वर्षानंतर खाजगी लोकांच्या नावांवर झाली.

मा.सभापती : उपआयुक्त श्री.खांडेकर, महानगरपालिकेचे प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिकेचे जुने कर्मचारी ज्यांना महानगरपालिकेचे ओपनस्पेस, मालमत्ता माहित असलेले असा एक अधिकारी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : तत्कालिन आयुक्तांनी ज्युनिअर इंजिनिअर श्री.शफीक व श्री.खरवडकर यांना नेमुन 300 पी.आर कार्ड मनपाच्या नावांवर आहे. हि सर्व माहिती प्रशासनाकडे आहे. व कायदेशीर कॉपी माझ्याकडे आहे. रेकॉर्ड माझ्याकडे आहे. डोक फोडल्यावर कार्यवाही होत नाही मी तर एक साधारण सदस्य आहे माझे कोण ऐकणार. मा.आयुक्त महानगरपालिकेचे सर्वोसेर्वे यांचे पेपरमध्ये मी वाचन केले. डोके फोडल्यावरही काम होत नाही तर मी काय? मी एक साधारण सदस्य आहे.

मा.आयुक्त : एक खुलासा करू इच्छितो. डोक फोडुन घ्यायची वेळ नाही तर डोके फोडायची वेळ असे बोललो आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : काय म्हणतात.

मा.आयुक्त : माझे नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मा.आयुक्त साहेबांकडे डोक फोडण्याची वेळ आलेली आहे.

मा.आयुक्त : स्वतःचे डोक नाही दुसऱ्याचे डोक फोडायची वेळ आलेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : एखाद्या अधिकाऱ्याचे डोके फोडावे 99 नगरसेवक तुमच्या पाठीशी आहे. हे करावेच लागेल तोपर्यंत अधिकारी तुमचे ऐकणार नाही.

मा.सभापती : शहराच्या मालमत्तेविषयी विषय चालू आहे. उपआयुक्त श्री.खांडेकर, प्रशासकीय अधिकारी, आणि श्री.खरवडकर यांना आदेशित करण्यात येते की, महानगरपालिकेच्या मालमत्तांचा सर्वे करण्यात यावा. किती मालमत्ता आहे. किती पी.आर कार्ड तयार आहे आणि किती दिवसांत तयार करणार आहे. 15 दिवस ते 1 महिण्यांचा वेळ देण्यात येतो त्यांनी मा.सर्वसाधारण सभेत स्थायी समिती सभेत माहिती सादर करावी. विषय पत्रिका घ्यावी.

श्री.मधुकर सावंत : टाउनप्लॅनिंग विभागात बांधकाम परवानगी देतो त्यांना बांधुन घ्यावे रेलीन क्वीशमेंट डीड करून दिल्यावर परवानगी द्यावी.

मा.आयुक्त : आत्ता आपण रेलीन क्वीशमेंट डिड करून घेत आहे. जो पर्यंत होत नाही तो पर्यंत परवानगी दिली जात नाही. परंतु बांधुन मात्र घेतले जात नाही. आदेशीत करण्यात येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : कायदेशिर सल्ला पाहिजे आपण हक्क सोडपत्र नियमानुसार करून घेत आहे ते बरोबर आहे काय? त्या आधारे नामांतर झाल्यानंतर महानगरपालिकेची मालकी जमीनीची आहेत काय? माझे बिल्डींग परवानगीचे चालु आहे. मी हक्क सोड प्रमाणपत्र महानगरपालिकेला करून दिले त्याची Legality काय आहे. प्रशासनाने खुलासा करण्यात यावा. सर्व बोगस आहे.

मा.सभापती : विषय क्रमांक 67 इतिवृत्त कायम करणे.

श्री.मधुकर सावंत : वार्ड ड च्या संदर्भात मागील वेळेस मा.आयुक्तांनी ,जालना रोड येथील स्टिलचे शेडचे अतिक्रमण काढण्यासंदर्भात आदेशित केले होते. परंतु त्यावर काहिही कार्यवाही झालेली नाही. सदर व्यक्ती रोजचा दहा लाखांचा व्यवसाय करीत आहे त्या ठिकाणी कारचे मोठे शोरूम उभे राहीलेले आहे.

मा.सभापती : काम थांबविण्यासंदर्भात आदेशीत केले होते.

श्री.मधुकर सावंत : काम चालु असतांना सभागृहाच्या निर्देशनास आणुन दिले होते परंतु काम थांबविण्यात आले नाही.

मा.सभापती : स्थायी समितीमध्ये रूलिंग दिल्यानंतर कार्यवाही होत नसेल तर संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही करावी लागेल. कार्यवाही काय केली सांगण्यात यावे.

प्रशासकीय अधिकारी : संबधीत जागेवर जे.सी.बी.सह स्वतः गेलो होतो. दोन रो पुर्ण तोडण्यात आल्या होत्या. संबधीताने कागदपत्र दाखवुन सांगीतले की, परवानगी काढण्यात येत आहे. परवानगी काढण्याकरीता आठ दिवसांचा वेळ देण्यात यावा. एक दोन स.आमदारांचे फोन आले होते.

मा.सभापती : कोणत्या आमदारांचे फोन आले होते माहिती देण्यात यावी. आमदारांचे नांवे सांगण्यात यावी. खाजदार आमदारांनी फोन केल्यावर थांबणार आहे काय?

प्रशासकीय अधिकारी : दोन रूम पुर्णतः तोडण्यात आल्या होत्या सन 1996च्या परवानगीचे कागदपत्र दाखविण्यात आले. आम्ही रिवाईज परवानगी घेत आहे असे सांगण्यात आले होते. त्यांना दिलेली वेळ संपत आलेली आहे त्यानंतर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

मा.सभापती : स्टे आल्यानंतर कार्यवाही करणार आहे का?

प्रशासकीय अधिकारी : माझ्याकडे चार्ज आल्यापासुन एकाही माणसाला कोर्टाकडुन स्टे मिळालेला नाही. टिळकनगरची जागा असेल किंवा कोणतीही जागा असेल.

श्री.मधुकर सावंत : प्रशासकीय अधिकारी यांचे म्हणण्यानुसार दोन रूम तोडण्यात आल्या. भिंत तोडण्यात आली दाखविण्यात यावे. कोर्टात जाण्यासाठी नोटीस देण्यात आली. महानगरपालिकेने कागदपत्र दिले नाही म्हणुन परवानगी नाकारलेली आहे. मी बोललो एक महिणा झाला अधिकाऱ्यांच्या कानावर टाकले कार्यवाही करा. सभागृहात खोटे बोलत आहे.

मा.आयुक्त : परवानगी बाबत ADTP यांनी सांगावे.

उपअभि.न.र. श्री.निकम : माझ्या माहितीप्रमाणे सदर परवानगी नाकारलेली आहे. सदरचा एरिया श्री.देशमुख यांचेकडे येतो. पडताळणी करून सभा संपल्यावर पाठवतो.

मा.सभापती : परवानगी नाकारली आहे का?

श्री.निकम : माझ्या माहितीप्रमाणे परवानगी नाकारलेली आहे प्रत्यक्ष बघुन खुलासा करण्यात येईल.

मा.आयुक्त : श्री.डी.पी.कुलकर्णी व श्री.देशमुख कोर्टातुन येत आहे. आल्यानंतर खुलासा कण्यात येईल.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : विषय पत्रिका घेण्यात यावी.

**विषय क्र. 67 :**

दिनांक 30/08/2010 (का.प.क्र.6) व दिनांक 07/09/2010 (का.प.क्र.7) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.सभापती : विषय क्रमांक 67 मंजूर.

**ठराव :**

दिनांक 30/08/2010 (का.प.क्र.6) व दिनांक 07/09/2010 (का.प.क्र.7) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**विषय क्र. 68 :** (दि. 25-10-2010 रोजीच्या सभेतील स्थगित करण्यात आलेला विषय क्र. 60)

मा.आयुक्त महोदय, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मान्यतेने उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या जाफरगेट येथील आठवडी बाजार(रविवार)शुल्क वसुलीसाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकुण दोन निविदा अनुक्रमे श्री.प्रितमकुमार गणेश हटवाल आणि श्री.दिनेश दादाराव आठवले अशा दोनच निविदा प्राप्त झाल्या असता लिफाफा क्र.01 (तांत्रीक लिफाफा) उघडण्यात आला असता अटी शर्तीची पुर्तता न झाल्याने लिफाफा क्र.02 (निविदा दर) उघडण्यात आलेले नव्हते.

त्यानंतर सन 2006-2007 ते 2009-2010 पर्यंतच्या मागील ठेक्याच्या दरा संदर्भाने (रविवार आठवडी बाजार) तुलनात्मक तक्ता तयार करून सन 2010-2011 साठी प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता श्री.प्रितमकुमार गणेश हटवाल यांची निविदा दर रू.19,500/- जो आधारभूत दरापेक्षा कमी असल्याने त्यांना वाटाघाटीसाठी बोलावून जो पूर्वीचा जास्तीत जास्त दर रू.21,000/- प्रति बाजार असा होता त्यापेक्षा जास्तीचा दर प्रतिबाजार रू.23,000/- मध्ये आठवडी बाजार शुल्क वसुलीचा ठेका घेण्यास संबंधीताने लेखी संमती दिली आहे. त्यास मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांची दिनांक 24/08/2010 रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे.

जर महानगरपालिकेने त्वरीत कार्यवाही सुरू केली तर येणारा बाजाराची वसुली ठेकेदार सुरू करू शकेल व पर्यायाने महानगरपालिकेचा रू.4,000/- इतका फायदा होऊ शकतो. तसेच सन 2010-2011 साठी दि.31 मार्च 2011 पर्यंत फक्त 6 ते 7 महिन्यासाठीच असल्याने ठेक्यात नमुद अटी शर्तीनुसार संबंधीतास एकुण बाजाराच्या 25 टक्के अनामत रक्कम आणि एकुण पाच बाजाराचे आगाऊ ठेका रक्कम भरून घेण्यासंदर्भाने कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली असून सदरील प्रस्तावास कार्योत्तर मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.सभापती : विषय क्रमांक 68.

श्री.रेणुकादास वैद्य :बाजाराच्या ज्या निवीदा होतात त्या वर्षभरासाठी निवीदा प्रक्रिया करतो परंतु दुर्देवाने या महानगरपालिकेत काम करत असतांना माझ्याही निर्देशनाव आपल्याही निर्देशनास आले असेल निवीदेचा कालावधी संपल्यावर पुन्हा निवीदेसाठी सहा सहा महिण्यांचा कालावधी नविन निविदा काढण्यात जातो. हे जे टेंडर झाले आहे ते सर्व नियमानुसार झाले आहे. आता यांना एक वर्षासाठी न करता नैसर्गिक 10 टक्के प्रत्येक वर्षी वाढ करून तीन चार वर्षासाठी देण्यात यावे. यामुळे निवीदेचा वेळ,पैसा वाचेल मधला जो सहा महिण्यांचा अवधी असतो यामध्ये महानगरपालिकेतुन निवीदेचा मालमत्ता विभागाचे अधिकारी चुकीच्या पध्दतीने कार्यवाही करतात. या मधील पिरेडचा जबाबदारी गुत्तेदारांची आहे का? महापालिका घेते आणि कंत्राटदाराला दिलय म्हणून आपण सांगतो. या सगळया भानगडीमध्ये महानगरपालिकेचे आर्थीक नुकसान होते. माझी विनंती आहे की, जे ॲग्रीमेंट करण्यात येते ते एक वर्षासाठी न करता तीन तीन वर्षासाठीचे करण्यात यावे.

मा.सभापती :मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावे की तीन वर्षासाठी ॲग्रीमेंट करता येईल का?

श्री.रेणुकादास वैद्य :दरवर्षी 10 टक्के नैसर्गिक वाढ होईल.

श्री.विजय वाघचौरे :दरवर्षी 10 टक्के नैसर्गिक वाढ होईल यामध्ये.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.सभापती साहेब क्लिअरकट रूलिंग देण्यात यावी.

मालमत्ता अधिकारी :देता येईल्

मा.सभापती :विषय क्रमांक 68 मध्ये प्रत्येकवर्षी 10 टक्के नैसर्गिक वाढ गृहित करून तीन वर्षासाठी मंजूर करण्यात येत आहे.

श्री.विकास जैन :रिकव्हरीची काळजी घेण्यात यावी.

श्री.विजय वाघचौरे :एक वर्षाची ॲडव्हान्स भरून घेण्यात यावी.

मा.सभापती :वर्षभराची रक्कम अगोदर भरणा करण्यात यावी. वर्ष संपण्याच्या अगोदर दुसऱ्या वर्षाचे भरून घ्यायचे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या जाफरगेट येथील आठवडी बाजार (रविवार) शुल्क वसुलीसाठी सन 2010-2011 साठी प्राप्त झालेल्या निविदांनुसार श्री.प्रितमकुमार गणेश हटवाल यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे प्रतिबाजार रू.23,000/- मध्ये आठवडी बाजार शुल्क वसुलीचा ठेका, आगाऊ रक्कम भरून घेण्यासह प्रचलित अटी-शर्तीनुसार बाजाराचे दरामध्ये प्रतिवर्षी 10% नैसर्गिक वाढ गृहीत धरून तीन वर्षाकरीता श्री.प्रितमकुमार गणेश हटवाल यांना बाजार शुल्क वसुलीचा ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 69 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारे विरंजक चुर्ण (ब्लिचींग पावडर) खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.12,01,200/- एवढ्याचे तयार करण्यात येवून त्यास स्थायी समिती विषय क्र.11, दि.15/06/2009 अन्वये मान्यता झालेली आहे. त्या अनुषंगाने ई-निविदा मार्फत डी-फॉर्मवर निविदा मागविण्यात आल्या. निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन (02) निविदा प्राप्त झाल्या असुन त्या खालील प्रमाणे आहे.

1. मे.फिनीक्स केमीकल्स - 14,498/- प्र.मे.टन
2. मे.एस.व्ही.एस.केमीकल कार्पोरेशन - 18,950/- प्र.मे.टन

वरील प्रमाणे दोन निविदा असुन त्यामध्ये तुलनात्मक दृष्ट्या कमी दर हा मे.फिनिक्स केमीकल्स यांचा असून रक्कम रू.14,498/- प्र.मे.टन असा दर असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी दि.24/10/2010 अन्वये मान्यता दिलेली आहे.

करीता मे.फिनिक्स केमीकल्स यांची रक्कम रू.14,498/-दराने हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रास लागणारे विरंजक चुर्ण (ब्लिचींग पावडर) खरेदी करण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रेणुकादास वैद्य :यामध्ये दोन निवीदा आलेल्या आहे. दोन्ही निवीदामध्ये प्रत्येक टनाच्या मागे चार हजाराचा फरक आहे. ब्लिचिंग पावडरमध्ये असे काय असते की, चार चार हजाराचा फरक आहे. खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :मागच्या वेळेसचे दर काय होते.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य :दरवर्षी किती ब्लिचिंग पावडर लागते. किती साठा उपलब्ध आहे.

शहर अभियंता :हर्सुल तलाव येथील वॉटर ट्रिटमेंट प्लॅन्ट त्यासाठी ही खरेदी करण्यात येते. साठा उपलब्ध नाही. तेथील साठा संपलेला आहे. येथील गरज ही फारोळा ट्रिटमेंट प्लॅन्ट येथुन आवश्यकतेनुसार केली जात आहे. हि वर्षभराची खरेदी करायची आहे. जो रेट आलेला आहे. 14498 आणि 18950 या दोनच निवीदा आलेल्या आहे. 14498 हा अत्यंत कॉम्पेटेटिव्ह रेट आलेला आहे. असा रेट यापुढे येणार नाही. हा दर जर चुकविला तर 18000 पैक्षा जास्त दराने घ्यावे लागेल.

मा.सभापती :विषय क्रमांक 69 मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रासाठी लागणारे विरंजक चुर्ण (ब्लिचींग पावडर) खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मक दृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.फिनिक्स केमीकल्स यांचेकडून रक्कम रू.14,498/- प्र.मे.टन या दराने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 70 :</u>**

कार्यकारी अभियंता (वार्ड ब आणि क) प्रस्ताव सादर करित आहे की, वॉर्ड क्र.25 सिडको एन-7 मध्ये विविध ठिकाणी कॉक्रीटींग करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-09 च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 11,99,950/- चे अंदाजपत्रक तयार आहे. या कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थिक वर्षात नविन काँक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्ष मधून करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केलेली आहे. व मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्याचे आदेशित केले आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रूपये 11,99,950/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.25 सिडको एन-7 मध्ये विविध ठिकाणी कॉक्रीटींग करणेच्या कामाचे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 11,99,950/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 71 :**

अतिरिक्त शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.महापौर महोदया सध्या स्वतःचे खाजगी वाहन (कार) वापरत असून त्यांनी नविन कार खरेदी बाबत मागणी केली आहे. तसेच मा.आयुक्त महोदय यांच्या वापरात असलेली इंडिगो कार एम.एच.20-यु-9797 सन 2004 मध्ये खरेदी करण्यात आली असून आतापर्यंत या कारचे एक लक्ष पेक्षा जास्त कि.मी. रनिंग झालेले आहे. दि.15/10/2010 रोजी या कारचा अपघात झाला असून जास्तीचे नुकसान झालेले आहे.

मा.महापौर व मा.आयुक्त यांचेसाठी एकूण दोन कार खरेदी करीता वाहनाचे उत्पादक टाटा मोटर्स लि.मुंबई यांचे शासकीय दराप्रमाणे दरपत्रक कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटर्स, प्रा.लि.औरंगाबाद यांचेकडून प्राप्त केले आहे. दरपत्रकातील दर खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | विवरण | नग | किमंत (प्रति वाहन) | एकूण किमंत |
|---|---|---|---|---|
| 1 | TATA- Manza 1.4 Aura Saffair (DEW-White-Petrol-BSIV) (जकात कर/इंशरन्स वगळुन) | 2 Nos | 5,24,786/- | 10,49,572/- |
| | | | Total Rs. | 10,49,572/- |

तरी वरीलप्रमाणे एकूण दोन कारच्या खरेदीस व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रू.10,49,572/- च्या खर्चास मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे. हे दर सध्याचे असून वाहनांचा ताबा घेतांना जी किमंत असेल त्याप्रमाणे कमी किंवा जास्त रक्कम अदा करावी लागेल. वाहनाची किमंत रक्कम रू.10,49,572/- टाटा मोटर्स लि. मुंबई यांना डिमांड ड्राफ्ट द्वारे अदा करावी लागेल. सदरील खर्च घसारा निधीतून करण्यात येईल.

तरी एकूण दोन टाटा मांझा पेट्रोल कार खरेदी करण्यासाठी रक्कम रू.10,49,572/- खर्चाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती :जे कर्मचारी रात्री बेरात्री 2.00 वाजता जायकवाडी येथे जातात. गाडी ही जुनी असुन खीळखीळी झालेली आहे त्या गाडीची पहाणी मी स्वतः केलेली आहे. 8 डिसेंबर पर्यंत त्या कर्मचाऱ्यांना गाडी देण्यात यावे म्हणून सांगण्यात आले होते. त्या गाडीसही मंजूरी देण्यात येत आहे. फारोळा व जायकवाडीसाठी लागणारी गाडी,जिप घेण्यात यावी. कारण रात्री बे रात्री त्यांना जावे लागते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.महापौर व मा.आयुक्त यांचेसाठी एकूण दोन कार खरेदी करीता वाहनाचे उत्पादक टाटा मोटर्स लि.मुंबई यांचे शासकीय दराप्रमाणे, कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.सान्या मोटर्स प्रा.लि.औरंगाबाद यांचेकडून दोन टाटा मांझा पेट्रोल कार खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या रक्कम रू.10,49,572/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

| अ.क्र. | विवरण | नग | किमंत (प्रति वाहन) | एकूण किमंत |
|---|---|---|---|---|
| 1 | TATA- Manza 1.4 Aura Saffair (DEW-White-Petrol-BSIV) (जकात कर/इंशरन्स वगळुन) | 2 Nos | 5,24,786/- | 10,49,572/- |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 72 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र. 38 अंतर्गत बंजारा कॉलनी भागातील गटार दुरूस्त करणे आहे. ह्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे सन 2008-09 च्या दरसूचीनुसार रक्कम रूपये 18,83,500/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांची दि.24/10/2010 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाचा खर्च हा देखभाल दुरूस्ती जलनिःसारण या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.18,83,500/- मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.38 अंतर्गत बंजारा कॉलनी भागातील गटार दुरूस्त करणेच्या तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 18,83,500/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 73 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्रं. 51 अंतर्गत गल्ली क्रं. 22 ते 29 (उत्तर भाग) इंदिरानगर येथे 100 व 150 मीमी व्यासाची डी.आय.के. 7 जलवाहीनी टाकणेचे प्रस्तावित आहे.

या कामाकरीता महाराष्ट्र जीवन प्रधिकरण या विभागाच्या सन 2009-10 च्या दरसुची नुसार अंदाजपत्रक रक्कम रूपये 10,35,801/- चे तयार करण्यात आले आहे. या कामावर होणारा खर्च सन 2010-2011 मधील अर्थसंकल्प भांडवली कामे पाणी पुरवठा या लेखाशिर्षकात पृष्ठ क्र.SCR-C-5 अ.क्र.-2 वर तरतुद उपलब्ध आहे. अंदाजपत्रकास मा.आयुक्तांची मान्यता झालेली आहे.

तरी वॉर्ड क्र.51 अंतर्गत गल्ली क्र.22 ते 29 (उत्तर भाग) इंदिरानगर येथे 100 व 150 मीमी व्यासाची डी.आय.के.7 जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रू.10,35,801/- चे मान्यतेबाबत तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.51 अंतर्गत गल्ली क्र.22 ते 29 (उत्तर भाग) इंदिरानगर येथे 100 व 150 मीमी व्यासाची डी.आय.के.7 जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.10,35,801/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 74 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.63 अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन 2008-09 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकीय रक्कम रू.14,67,700/- होत आहे. सदरील काम सन 2010-11 च्या अर्थसंकल्पात नवीन डांबरी रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत प्रस्तावित आहे. प्रस्तावित

अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजुरी प्राप्त करून मा.स्थायी समिती सभेसमोर प्रस्ताव सादर करण्याचे आदेशित केले आहे.

तरी रक्कम रू.14,67,700/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.63 अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे या कामाचे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.14,67,700/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 75 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.63 अंतर्गत कोकणवाडी, केसरसिंगपुरा भागात जुनी दगडी गटार तोडून नविन आर.सी.सी. गटार बांधावयाची आहे. ह्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन 2008-09 च्या दर सुची नुसार रक्कम रू.15,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाचा खर्च शहरी भागात खुल्या गटारी बांधणे या लेखाशिर्ष मधुन करण्यात येईल.

करिता कामाचे अंदाजपत्रक र.रू.15,00,000/- मान्यतेस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.63 अंतर्गत कोकणवाडी, केसरसिंगपुरा भागात जुनी दगडी गटार तोडून नविन आर.सी.सी. गटार बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.15,00,000/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 76 :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) यांनी प्रस्ताव दिला की, बारावा वित्त आयोगाकडून प्राप्त निधीतून औरंगाबाद शहरातील वार्ड ई व फ अंतर्गत विविध रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम हाती घेण्यात आलेले आहे. सादर कामाची अंदाजपत्रकीय र.रू.2,44,70,202/- इतकी असून या कामाकरीता 7 % कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. त्यामूळे या कामाच्या रक्कमेत र.रू.16,53,212/- इतकी बचत होत आहे.

उपरोक्त बचतीमधून मोतीवालानगर या वसाहती मधील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात यावे अशी मागणी केली असून त्यास मा.आयुक्त यांची प्रशासकीय मान्यताही प्राप्त झाली आहे.

तरी बारावा वित्त आयोगाचे प्राप्त निधीत होणाऱ्या बचतीमधून मोतीवालानगर या वसाहतीमधील रस्त्यांचे डांबरीकरण करणेचा अं.प. र.रू. 16,53,212/- चा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रेणुकादास वैद्य :रूपये 2,44,70,212/- कशासाठी आहे. 16 लाखाचे काम करणार आहे याबाबतीत खुलासा देण्यात यावा.

मा.सभापती : खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता (इ व फ) : बाराव्या वित्त आयोगाचे कामे आहेत. रूपये 2,44,70,202/- इतकी असून या कामाकरीता 7 टक्के कमी दर निविदा प्राप्त झालेली आहे. त्याच्या सेव्हींगमध्ये हे कामे प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

श्री.विकास जैन : विषया बाबत माहिती देण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : 2,44,70,202/- रूपये हे बाराव्या वित्त आयोगाचे पैसे आहेत. प्रभाग इ आणि ब मध्ये ही कामे घेतली आहे. हे कामे कुणी सुचविली आहे. कामाची यादी कुणी तयार केली.

मा.सभापती : दोन कोटी रूपये कुठे खर्च करणार आहे.

कार्य.अभियंता (इ व फ) : 2,44,70,202/- रूपयांची कामे मा.सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर झालेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : मा.सर्वसाधारण सभेने बाराव्या वित्त आयोगाचे 2,44,70,202/- रूपये हे रस्त्याचे डांबरीकरणासाठी ठेवलेले आहे. ही कामे कुठली आहे कुणी सुचविली आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन : कामे आपण ठरवतो का शासन ठरवतो. शेवटी काम करून घेण्याचा अधिकार कुणाचा आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : प्रभाग इ आणि फ मध्येच कामे का घेण्यात आली.

मा.सभापती : 2,44,70,202/- रूपयांचे कामे झालेली आहे का?

शहर अभियंता : 2,44,70,202/- रूपयांची कामे मागच्या वर्षी बाराव्या वित्त आयोगातुन घेतलेली आहे. मा.सर्वसाधारण सभेने ही कामे प्रस्तावित केलेली होती. त्यानुसार ही कामे घेण्यात आलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : कामाच्या नावासह कामे प्रस्तावित केलेली होती का?

शहर अभियंता : होय कामाच्या नावासह प्रस्तावित केलेली होती.

मा.सभापती : हया बॉडीमध्ये झालेले आहे का मागील बॉडीमध्ये.

शहर अभियंता : मागील बॉडीमध्ये झालेले आहे. कामे मागच्या वर्षीच मंजूर झालेली आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य : असा कुठलाही विषय कामाच्या नावाने मंजूर झालेला नाही.

शहर अभियंता : कार्यकारी अभियंता इ व फ त्या कामांची फक्त देखरेख करीत आहे. शहरातील सहा ते सात ठिकाणची कामे आहेत. मा.सभापती यांचे वार्डातील एमआयडीसी येथील मेन रोडचे काम बाराव्या वित्त आयोगाच्या कामातुन चालु आहे. एकूण 7 कामे आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य : सर्वसाधारण सभेने हया कामाची यादी मंजूर केलेली नाही यावर आम्ही ठाम आहे.

श्री.विकास जैन : ही कामे कुणी Suggest केली.

शहर अभियंता : सर्वसाधारण सभेचा ठराव आहे. 940 क्रमांकाचा ठराव आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : ठराव दाखविण्यात यावा.

मा.सभापती : ठरावाची कॉपी दाखविण्यात यावी.

(ठरावाची कॉपी मा.सभापती आणि स.सदस्यांना दाखविण्यात येते)

श्री.विकास जैन : मेन अजेंडामध्ये चर्चा झालेली आहे काय?

श्री.रेणुकादास वैद्य : शासनाकडुन जो निधी येतो त्याबाबतीत पॉलिसी ठरविली पाहिजे. सभागृहाचे मत घ्यायला पाहिजे. संबंधीत नगरसेवक, पदाधिकारी यांचे मत घ्यावयास पाहीजे.

मा.सभापती : किमान पाच पदाधिकाऱ्यांचे त्यामध्ये.

श्री.विकास जैन : प्रशासन गुप्त ठेवतो.

श्री.रेणुकादास वैद्य : प्रशासनापेक्षा आमच्या मनाने कामे सांगीतले ते करण्यात यावे म्हणून सांगण्यात येतात.

श्री.महेश माळवतकर : बारावा वित्त आयोगाचे काम फक्त वार्ड इ व फ मध्ये आहे काय?

श्री.रेणुकादास वैद्य : 16 लाख 53 हजाराचे काम या एकच वार्डात का दुसऱ्या वार्डात का नाही.

श्री.विजय वाघचौरे : 16 लाख 53 हजार कशासाठी आलेले आहे. 16,53,212 च्या बाराव्या वित्त आयोगाच्या 60 टक्के सेव्हींगमधुन महानगरपालिकेचे चांगले काम करत आहे. एका वार्डात करतो आहे. 99 पैकी एका वार्डाची निवड का झाली खुलासा करण्यात यावा.

श्री.रेणुकादास वैद्य : स.सदस्यानी सांगीतले की मनाने केले. खुलासा करण्यात यावा.

कार्यकारी अभियंता : मा.उपमहापौर साहेबांची मागणी आहे. तेथील रोडची स्थिती अत्यंत खराब झालेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : सेव्हींग या वार्डात का वापरण्यात आली दुसऱ्या वार्डात का नाही वापरण्यात आली. दुसऱ्या वार्डात वापरण्यात आली असते का? याबाबतची माहिती द्यावी.

मा.सभापती : एखादे काम हे दुसऱ्या वार्डामध्ये करण्यात यावे विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बारावा वित्त आयोगाकडून प्राप्त निधीतून औरंगाबाद शहरातील वार्ड ई व फ अंतर्गत विविध रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम र.रू.2,44,70,202/- इतकी असून या कामाकरीता 7% कमी दराची निविदा प्राप्त झाल्यामूळे या कामाच्या होणाऱ्या बचतीमधून मोतीवालानगर या वसाहतीमधील रस्त्यांचे डांबरीकरण करणेसाठी रक्कम रू.16,53,212/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 77 :</u>**

मा.आयुक्त महोदय, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मंजुरीनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेच्या मालकीच्या विविध ठिकाणचे रिक्त असलेले सभागृह खालील प्रमाणे भाड्याने मिळणेसाठी अर्ज प्राप्त झाले असून भाडे समितीची बैठक आयोजीत करून सिध्द शिघ्र गणकानुसार दर निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार रिक्त सभागृह भाड्याने देणे योग्य.

01. दिनांक 05/07/2010 रोजी श्रीमती अरूणा कोचुरे यांनी अर्ज देऊन नेहरू युवा केंद्र, औरंगाबाद करिता मोदी हॉटेलच्या पाठीमागील कम्युनिटी हॉल भाड्याने मिळणे बाबत विनंती केली आहे.

त्यानुसार मोदी हॉटेलच्या पाठीमागील असलेले सभागृह ज्याचे क्षेत्रफळ 117.6 चौ.मी. असून सिध्द शिघ्र गणकानुसार रक्कम रू.134/- प्रती चौ.मी. प्रती माह नुसार प्रथम पाच वर्षासाठी भाड्याने देणे योग्य.

तथापी, वरील प्रमाणे हॉल भाड्याने देणेस मान्यता प्राप्त झाल्यास संबंधीताकडून एक वर्षाचे इमारत भाडे, मासिक भाड्याच्या बारापट अनामत रक्कम, सेवा शुल्क, अकृषीक कराचा भरणा करून घेऊन महानगरपालिकेच्या प्रचलीत अटी शर्तीनुसार भाडे पट्ट्याने देणे योग्य.

करिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.अ.साजेद अ.सत्तार : विषय क्रमांक 77 मंजूर करावा.

मा.सभापती : विषय क्रमांक 77 स्थगीती देण्यात येते.

श्री.विकास जैन : ही जी कामाची यादी दाखविण्यात आली आहे ती इथे मंजूर केलेली आहे का? की महाराष्ट्र शासनाने मंजूर केली आहे.

कार्य.अभियंता (इ व फ) : मा.सर्वसाधारण सभेने मंजूर केलेले आहे.

मा.सभापती :विषय क्रमांक 77 स्थगीती देण्यात येत आहे.

**ठराव :**

सदर प्रस्ताव स्थगित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 78 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत शहरातील महत्वाच्या रस्त्यावर कमानी उभारणे व दिशादर्शक फलक लावण्यासाठीचे प्रकल्पास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.194/4 दि.19/01/2001 अन्वये मंजुरी मिळाल्यानुसार आणि मा.स्थायी समिती ठराव क्र.88 दि.13/3/2003 अन्वये मे.व्हिजन कम्युनिकेशन यांचे 10 वर्ष 6 महिने कन्शेशन कालावधीच्या निविदेस मंजुरी मिळाली. सदर कमानी उभारण्याचे प्रकल्पासाठी म.न.पा., देवगिरी नागरी सहकारी बँक (Lender Bank) व प्रकल्पाचे विकासक मे.व्हीजन कम्युनिकेशन यांचेमध्ये दि.31/03/2003 रोजी त्रिपक्षीय करारनामा करण्यात आला.

सदर करारनाम्यातील देवगिरी नागरी सहकारी बँक (Lender Bank) यांनी विकासकाकडील थकीत कर्ज वसुलीसाठी करारनामामधील कलम 4 (1) नुसार निविदा प्रक्रीया करून सदर प्रकल्प मे.सेतु मिडीया स्पेशालिस्ट या संस्थेस हस्तांतरणाबाबत दिनांक 4/10/2010 अन्वये कळविले आहे. मुळ त्रिपक्षीय करारनामा शर्ती अनुसार व मुळ प्रकल्प मर्यादेनुसार म्हणजेच दिनांक 30/9/2013 मर्यादेपर्यंत मे.सेतु मिडीया स्पेशालिस्ट या संस्थेकडे सदर प्रकल्पाचे हस्तांतरण करणेसाठीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.अ.साजेद अ.सत्तार : ऐनवेळीचे विषय मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती : ऐनवेळचे सर्व विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगररपालिका हद्दीत शहरातील महत्वाच्या रस्त्यावर कमानी उभारणे व दिशादर्शक फलक लावण्यासाठीचे प्रकल्पासाठी म.न.पा., देवगिरी नागरी सहकारी बँक (Lender Bank) व प्रकल्पाचे विकसक यांचेमध्ये झालेल्या त्रिपक्षीय करानामामधील कलम 4(1) नुसार देवगिरी नागरी सहकारी बँक (Lender Bank) यांनी या प्रकल्पाचे विकसक मे.व्हिजन कम्युनिकेशन यांचेकडील थकीत कर्ज वसुलीसाठी सदर प्रकल्प हस्तांतरणाबाबत दि.4/10/2010 अन्वये कळविल्याप्रमाणे मुळ त्रिपक्षीय करारनामा शर्ती अनुसार व मुळ प्रकल्प मर्यादेनुसार म्हणजेच दि.30/9/2013 मर्यादेपर्यंत मे.सेतु मिडीया स्पेशालिस्ट या संस्थेकडे सदर प्रकल्पाचे हस्तांतरण करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 79 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, वॉर्ड क्र.65 अंतर्गत रमानगर भागात प्रीकास्ट आरसीसी 450 मी.मी. व्यासाची अर्धगोलाकार सरफेस गटार बांधणे ह्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे सन 2008-09 च्या दरसुचीनुसार रक्कम रूपये 19,95,000/- चे अंदाजपत्रक तयार

करण्यात आलेले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांची दि.17/11/2010 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाचा खर्च हा शहरी भागात खुल्या गटारी बांधणे या लेखाशिर्षका अंतर्गत करण्यात येईल.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 19,95,000/- मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.65 अंतर्गत रमानगर भागात प्रीकास्ट आरसीसी 450 मी.मी. व्यासाची अर्धगोलाकार सरफेस गटार बांधणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रूपये 19,95,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 80 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उपआयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या संत एकनाथ रंग मंदिर येथील वाहनतळ शुल्क वसुली संदर्भाने सन 2010-11 साठी दोन वेळा जाहीर निविदा प्रसिध्द करून आधारभुत रक्कम रू.25,000/- ठेवण्यात आली होती. (सन 2009-2010 मध्ये सदर वाहनतळ शुल्क वसूली रक्कम रू.7100/- मध्ये ठेका देण्यात आला होता. परंतु त्यास योग्य तो प्रतिसाद न मिळाल्याने आज पर्यंत कार्यालयीन कर्मचाऱ्यांकडून वसूली करण्यात येत असून वसूली ही सरासरी रू.4000/- प्रती महा वसूल होत असल्याने) दुसऱ्या वेळी प्राप्त झालेल्या एकमेव निविदा सम्राट अशोक महिला बचत गट यांची रक्कम रू.9000/- ही अतिउच्च रक्कमेची निविदा प्राप्त झाली असता संबंधीतास प्रकरणांत वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता संबंधीतांनी नमूद केलेल्या दरापेक्षा रक्कम रू.100/- जास्तीचे म्हणजे रक्कम रू.9100/- प्रती महा प्रमाणे वाहनतळ शुल्क वसूलीचा ठेका संमती दर्शविली असून त्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली असल्याने सदर वाहनतळ वसूलीचा ठेका सन 2010-11 साठी सम्राट अशोक महिला बचत गट, लक्ष्मी कॉलनी, छावणी, औरंगाबाद यांचे नावाने मंजूर करणे योग्य राहील.

करिता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या संत एकनाथ रंग मंदिर येथील वाहनतळ शुल्क वसुलीकरीता प्राप्त निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सन 2010-11 या वर्षासाठी सम्राट अशोक महिला बचत गट, लक्ष्मी कॉलनी, छावणी, औरंगाबाद यांना रक्कम रू.9100/- प्रती महा प्रमाणे सदर वाहनतळ वसूलीचा ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 81 :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.24 सिडको एन-1 भागात फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन -2008-2009 च्या दरसुचीनुसार अं.प. रक्कम रू.1999350/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थीक वर्षात नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा मधून करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय, यांची मान्यता होऊन मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेसाठी शिफारस केली आहे.

तरी अं.प. र.रू.1999350/- चे अं.प. प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.24 सिडको एन-1 भागात फुटपाथवर पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.1999350/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 82 :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वॉर्ड क्र.24 सिडको एन-1, सेक्टर सी व सेक्टर ई लगतच्या रस्त्यांचे पुनर्डाबंरीकरण करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन -2008-2009 च्या दरसुचीनुसार अं.प. रक्कम रू.1999400/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2010-11 या आर्थीक वर्षात शहरी भागात पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्षा मधून करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय, यांची मान्यता होऊन मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेसाठी शिफारस केली आहे.

तरी अं.प. र.रू.1999400/- चे अं.प. प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.24 सिडको एन-1, सेक्टर सी व सेक्टर ई लगतच्या रस्त्यांचे पुनर्डाबंरीकरण करणेच्या कामाचे तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.1999400/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 83 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.जालना रोड क्रांतीचौक येथील उड्डाणपुलाच्या कामात बाधीत होणारी 700 मी.मी. व्यासाची जलवाहिनी स्थलांतरीत करणे बाबत ह्या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे सन 2009-10 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक र.रू.31,74,668/- चे तयार करण्यांत आलेले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांची दि.10/06/2010 अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. सदरील कामाची फेरनिविदा काढली असता निविदा स्विकृतीच्या अंतीम दिवशी दि.17/06/2010 रोजी मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 45.99% जास्त दराची निविदा प्राप्त झाली. मा.आयुक्त महोदय, यांच्या दालनात दर वाटाघाटी होऊन संबंधीत ठेकेदाराने सदरील कामाची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 41.99% जास्त दराने काम करण्यास स्वीकृती दिली आहे. त्यास मा.आयुक्त महोदय, यांनी मान्यता दिलेली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो.जालना रोड क्रांतीचौक येथील उड्डाणपुलाच्या कामात बाधीत होणारी 700 मी.मी. व्यासाची जलवाहिनी स्थलांतरीत करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 41.99% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 84 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.31 मधील काला दरवाजा ते रोहीलागल्ली ते लोटा कारंजा चौक या रस्त्यावरील बाबा फरजन यांचे घराजवळील नाल्यावरील पुलास, पुलाच्या मधोमध साधारण 8 फुट व 5 फुट रूंद आकाराचे भगदाड पडले असून सदर पुलाची स्थिती अतिशय धोकादायक झाली आहे.

मागील दोन महिन्यांपासून नौबत दरवाजा दुरूस्तीमुळे सिटी चौकाकडे जाणारा मार्ग देखील वाहतुकीस बंद करण्यात आलेला आहे. त्यामूळे सिटी चौक, सराफा या भागाकडे जाणारी पूर्ण वाहतूक रोहीला गल्ली पुला मार्गे जात होती. त्यातच सदर पुलाचा कमकुवत झालेला भाग पडला असल्यामूळे, एखादे वाहन अथवा पादचारी या ठिकाणी पडून मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. व्ही.आय.पी. रोडकडून शहरात येण्यासाठी नौबत दरवाजाचा रस्ता पूर्वीच बंद असल्यामूळे तसेच काला दरवाजामार्गे सदर पुलावरील रस्ता देखील बंद केल्यामूळे वाहतूकीस पर्यायी रस्ता उपलब्ध राहीलेला नाही. वाहतुकीची अतिशय कोंडी होत असून या भागातील नागरीक सतत तक्रारी करत आहेत. धोकादायक झालेला पुल अतिशय जुना असून पुलाचे बांधकाम खांडकी, दगड व चुन्यामध्ये झालेले असून या पुलास तीन मोऱ्या आहेत. पुलाची लांबी सुमारे 15 मीटर/ रूंदी 5 मीटर आहे. पुलाच्या मोऱ्या, दगड, खांडकी अतिशय खिळखिळ्या झाल्या असून पुलाच्या उत्तर बाजूच्या मोरीतील खांडकी पडल्यामूळे तसेच इतर भागाची अवस्था अतिशय खराब झाली असल्यामूळे धोकादायक स्थिती निर्माण झाली आहे.

वॉर्ड क्र. 31 मधील रोहिलागल्ली येथील वरील नमुद जुना पूल पाडून नविन आर.सी.सी. पुल बांधण्याचे कामासाठी मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.889 दिनांक 21/12/2009 अन्वये रक्कम रूपये 30 लक्ष उपलब्ध करून देणेस आणि पुलाचे कामाचे ढोबळ अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त आहे. या मान्यतेप्रमाणे सन 2008-09 च्या दरसुचीप्रमाणे तयार केलेल्या अंदाजपत्रकाच्या कामाच्या निविदा तीन वेळा मागविण्यात आल्या असता तीनही वेळेस एकही निविदा प्राप्त झाली नसल्याचा अहवाल ई निविदा विभागाकडून दि.25/05/2010, दि.04/06/2010 व दि.03/07/2010 रोजी प्राप्त झाला आहे. निविदा प्रक्रीया करूनही प्रतिसाद मिळत नसल्यामूळे आणि काम करणे आवश्यक असल्यामूळे काम करणाऱ्या कंत्राटदारांना बोलावून हे काम करणेसाठी बंद पाकीटमध्ये दर देणेस सुचविले असता प्राप्त दराचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. मे.शहा कन्स्ट्रक्शन - 24.30% जास्त
2. मे.हायवे कन्स्ट्रक्शन - 28.70% जास्त
3. मे.मोना कन्स्ट्रक्शन - 36.15% जास्त

वरीलपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 24.30% जास्त हे दर मे.शहा कन्स्ट्रक्शन प्रोप्रायटर अलताफ अली शहा यांचे आहेत आणि या दरानुसार कामाची रक्कम रू.37,28,539/- होत आहे. सन 2010-11 ची दरसुची (DSR) प्राप्त झालेली आहे. सन 2008-09 व सन 2010-11 च्या दराची तुलना केली असता यामध्ये सुमारे 20% वाढ झाली आहे. उपरोक्त प्राप्त दर हे सन 2008-09 च्या अंदाजपत्रकापेक्षा 24.30% जास्त असल्यामूळे आणि संबंधित कंत्राटदारास सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पुलाचे प्रमाणित डिझाईन प्राप्त करून काम करण्याची जबाबदारी दिलेली असल्यामूळे प्राप्त 24.30 % जास्त दरास शिफारस करण्यात आली असून यास दिनांक 16/11/2010 रोजी मा.आयुक्त महोदय यांची मान्यता प्राप्त आहे. अंदाजपत्रक रक्कम रू.29,99,629/- वर 24.30 % जास्त दराप्रमाणे रू.37,28,539/- एवढी कामाची रक्कम होत आहे.

तरी मे.शहा कन्स्ट्रक्शन प्रोप्रायटर श्री.अलताफ अली शहा यांची 24.30 % जास्त दराचे दरपत्रक व त्यानुसार कामाची होणारी रक्कम रू.37,28,539/- मान्यतेच्या विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.31 मधील काला दरवाजा ते रोहीलागल्ली ते लोटा कारंजा चौक या रस्त्यावरील बाबा फरजन यांचे घराजवळील नाल्यावरील जुना पूल पाडून नविन

आर.सी.सी. पुल बांधण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.शहा कन्स्ट्रक्शन प्रोप्रायटर श्री.अलताफ अली शहा यांची 24.30 % जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 85 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्राणी संग्रहालय येथे आजारी प्राण्यांसाठी निवारा व उपचार कक्ष बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाची दरसूची सन 2008-09 नुसार तयार करण्यात आले असून अं.प. र.रू.9,99,321/- आहे.

अंदाजपत्रकास दि.28/05/2010 रोजी मा.आयुक्त महोदय यांची मान्यता प्राप्त झाली आहे. सदर कामाच्या निविदा मागविण्यात आली असता प्रथमवेळी एकही निविदा ई निविदा विभागाकडे प्राप्त झाली नाही. त्यानंतर पुन्हा दुसऱ्यांदा निविदा मागविण्यात आल्या असता दिनांक 07/07/2010 रोजी निविदा उघडण्यात आल्या त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

1. मे.अरबाज कन्स्ट्रक्शन - अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.86% जास्त दराने
2. मे.ड्रिम लॅन्ड कन्स्ट्रक्शन - अंदाजपत्रकीय दरापेक्षा 100% जास्त दराने

वरीलपैकी तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची आणि अंदाजपत्रकीय दरापेक्षा 8.86% जास्त दराची निविदा मे अरबाज कन्स्ट्रक्शन यांची आहे. सन 2008-2009 चे दर (DSR) आणि सन 2010-11 चे चालू दर (DSR) ची तुलना केली असता यामध्ये सुमारे 20% वाढ झाली आहे. त्यामूळे प्राप्त 8.86% जास्त दराच्या निविदेस शिफारस करण्यात आली असून मा.आयुक्त महोदय यांची दि.24/10/2010 रोजी मान्यता प्राप्त झाली आहे. प्रस्तुत कामाची एकूण रक्कम रू.10,87,861/- पैकी 10 लक्ष BRGF निधीमध्ये उपलब्ध आहे. उर्वरीत रक्कम रू.87,861/- इतर कामाच्या बचतीमधून भागविण्याचे प्रस्तावित आहे.

तरी 8.86% जास्त दराची मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांच्या निविदेस रक्कम रू.10,87,861/- ला मान्यतेच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्राणी संग्रहालय येथे आजारी प्राण्यांसाठी निवारा व उपचार कक्ष बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांची 8.86 % जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 86 :**

कार्यकारी अभियंता, वॉर्ड इ व फ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जयभवानी नगर येथील नाल्यातील गाळ काढून खोली वाढविणे बाबतच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2008-2009 च्या दरसूचि नुसार रक्कम रूपये 10,20,700/- चे अंदाजपत्रक असून सदरील कामाचा खर्च जलनिःसारण देखभाल दुरूस्ती या लेखा शिर्षकामधून प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. व प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालीलप्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

1. मे.अरबाज कन्स्ट्रक्शन - 21.86 % कमी दराने
2. श्री.सय्यद फैजुल हक - 18.25 % कमी दराने
3. श्री.मुजीबुरहेमान एम.खान महेमुद खान - 13.53 % कमी दराने
4. मे.एल.के.कन्स्ट्रक्शन - 5.1 % कमी दराने

वरीलप्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या म्हणजे सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.86 % कमी दराची मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांची निविदा प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा 21.86 % कमी दराचा निविदेचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जयभवानी नगर येथील नाल्यातील गाळ काढून खोली वाढविणे बाबतच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांची 21.86 % कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 87 :**

प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, औरंगाबाद-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर औरंगाबाद महानगर पलिकेचा मिटमिटा गावाजवळ मुख्य रस्त्यालगत जकात कर वसुलीचा पत्राच्या शेडचा जकात नाका अनेक वर्षापासून अस्तीत्वात असून ते ठीकाण अतिशय अरुंद असल्याने तेथे नेहमीच जास्तीची वर्दळ असते. सदर नाक्यावर जकात कर भरण्यासाठी येणारी वाहने रोडवर थांबल्यामुळे सदर ठीकाणी नेहमी लहान मोठे अपघात होऊन जिवीत हानी होत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी नेहमी जकात वसूली करत असतांना नागरीका सोबत वाद विवादाचे प्रसंग निर्माण होतात. त्यामुळे औरंगाबाद पोलीस उपआयुक्त (पारिमंडळ) यांचे कार्यलयाकडून सदरील नाका मिटमिटा येथून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत करणेबाबत वारंवार कळविण्यात येत आहे.

मिटमिटा गावाजवळील जकात नाक्यासमोर बऱ्याच वेळा गंभीर स्वरुपाची घटना घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे सदरील जकात नाका महानगरपालिकेने त्वरीत स्थलांतरीत करणे आवश्यक होते. त्यानुसार जकात संकलन अभिकर्ता मे.सहकार ग्लोबल प्रा.लि. यांना मिटमिटा-मुंबई रोड येथील महानगरपलिकाचा जकात नाका शरणापूर फाटयाजवळील,औरंगाबाद मंजूर विकास योजना व मनपा हद्दीनुसार मिटमिटा हे गाव मनपा हद्दीत असून त्यालगतचा सर्वे गट नं.94/2 मौजे शरनापूर हा मनपा हद्दी लगत असलेल्या मिटमिटा गावाच्या शिवेस लागून असल्याने सदरील गट क्र.94/2 मधील श्री.राजेंद्र बागमल मुनोत व इतर 7 जनाच्या मालकी व ताब्यातील एकूण 7 एकर 26 गुंठे जमीनी पैकी अंदाजे 1 एकर मुंबई रोड लगतची जमीन भाडयाने घेऊन त्यावर नविन जकात नाका उभारणी करण्यासाठी जकात संकलन अभिकर्ता यांनी तयारी दर्शवली. सदर जमीनीचे भाडे जकात संकलन अभिकर्ता यांनी अदा करावे या अटीवर जकात नाका उभा करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार संबंधित जकात संकलन अभिकर्ता यांनी प्रथमतः नाक्याची स्वखर्चाने उभारणी केलेली आहे.

जकात कर व रहदारी फी वसूली संदर्भात दि.1/7/2010 ते 30/6/2011 पर्यंत करण्यात आलेल्या करारनाम्या अंतर्गत असलेल्या अटी व शर्ती मधील अट क्र.7 व 32 मधील तरतूदीनुसार सदरील नाक्याचा ताबा मात्र नेहमीसाठी महानगरपलिकेचा राहिल व त्यासाठी लागणारे लाईट बील, पाण्याचे बील व जागेचे भाडे इत्यादी दर महा जकात अभिकर्ता यांनी परस्पर भरावयाचे आहे. जकात नाक्याचा बांधकामाच्या खर्चाबाबतचा धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या प्रमुख उत्पन्न स्त्रोताशी निगडीत असून त्यासाठी जकात संकलन अभिकर्ता यांना मिटमिटा गावाजवळील वर्दळीच्या ठिकाणी अपघात प्रवर्णक्षेत्र असलेला जकात नाका नविन ठिकाणी स्थलांतरीत करण्याशिवाय दुसरा कुठलाही पर्याय नव्हता. त्यामुळे संबंधित जकात अभिकर्ताने सदरील नविन जकात नाका उभारणीच्या बांधकामासाठी अपेक्षित असलेला अदांजित

खर्च रक्कम रु.27,55,876/-(रु.सत्तावीस लाख पंच्चावन्न हजार आठशे शहात्तर) असून त्यापैकी 50% खर्च मनपातर्फे अदा करणे बाबत संबंधिताची मागणी आहे. नाका उभारणीची जागा मनपाची नाही व त्यावर मनपा खर्च करु शकत नाही. परंतू नाका उभारणी करुन देणे हेही महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. कारण जुन्या नाक्यावर वारंवार अपघात होऊन मूत्युचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे धोरणात्मक बाब म्हणून एकूण खर्चाच्या 50% रक्कम जास्तीत जास्त रु.13,77,938/- (रु.तेरा लाख सत्त्याहत्तर हजार नऊशे अडोतीस) जागेवर प्रत्यक्ष झालेल्या कामाच्या मोजमापानुसार संबंधितास (4) समान हप्त्यात वळती करुन घेण्यास तसेच नाक्यावरची स्थावर मालमत्ता लाईट पोल,टिन शेड, विद्यूत सामुग्री इत्यादी महानगरपालिकेच्या मालकीचे राहील. त्याबाबत संबंधिताकडून तसे बंधपत्र घेणेच्या अटीवर मिटमिटा नाका शरणापूर गट क्र.94/2 येथे स्थलांतरीत करण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

औरंगाबाद-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर औरंगाबाद महानगरपलिकेचा मिटमिटा गावाजवळ मुख्य रस्त्यालगत जकात कर वसुलीचा पत्राच्या शेडचा जकात नाका अनेक वर्षापुर्वीच्या जकात नाक्यावर जकात कर भरण्यासाठी येणारी वाहने रोडवर थांबल्यामुळे सदर ठीकाणी नेहमी लहान मोठे अपघात होऊन जिवीत हानी होत आहे. म्हणुन मिटमिटा गावाजवळील वर्दळीच्या ठिकाणी अपघात प्रवर्णक्षेत्र असलेला जकात नाका नविन ठिकाणी स्थलांतरीत करण्याशिवाय दुसरा कुठलाही पर्याय नसल्यामुळे तसेच नाका उभारणी करुन देणे हेही महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. करीता धोरणात्मक बाब म्हणून एकूण खर्चाच्या 50% रक्कम जास्तीत जास्त रु.13,77,938/- (रु.तेरा लाख सत्त्याहत्तर हजार नऊशे अडोतीस) जागेवर प्रत्यक्ष झालेल्या कामाच्या मोजमापानुसार संबंधितास (4) समान हप्त्यात वळती करुन घेण्यास तसेच नाक्यावरची स्थावर मालमत्ता लाईट पोल, टिन शेड, विद्यूत सामुग्री इत्यादी महानगरपालिकेच्या मालकीचे राहील. त्याबाबत संबंधिताकडून तसे बंधपत्र घेणेच्या अटीवर मिटमिटा नाका शरणापूर गट क्र.94/2 येथे स्थलांतरीत करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 88 :**

कार्यकारी अभियंता (प्रभाग ई व फ) यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्रं.83 मधून अस्तित्वातील असलेल्या नाल्याची संरक्षित भिंतीची दुरूस्ती व नाला चायनलायझींग करणे या कामाचे अप MJP DSR व PWD, DSR 2008/2009 नुसार तयार करण्यात आलेले असून कामाचा समावेश सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पात करण्यात आलेला आहे. कामाचे अंदाजपत्रक रू.17,83,500/- चे आहे. सदर कामास मा.आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे.

तरी कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्रं.83 मधून अस्तित्वातील असलेल्या नाल्याची संरक्षित भिंतीची दुरूस्ती व नाला चायनलायझींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.17,83,500/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 89 :**

मा.आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या सावंगी (खांब तलाव) येथील तलावामध्ये मत्स्य व्यवसाय करण्याकरीता (तीन वर्षासाठी) 01 जोनवारी 2011 ते 31 डिसेबंर 2013 पर्यंत ठेका पध्दतीने देण्यासाठी स्थानिक वर्तमानपत्रात

जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली असता सदर प्रकरणी एकुण प्राप्त निविदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | निविदाधारकांचे नांव | अपेक्षित रक्कम | प्राप्त दर | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.बाळु भिमराव गायकवाड | 1,76,000/- | 72,500/- | सदर ठेका तीन वर्षासाठी असून प्रथम वर्षासाठी मंजूर र.रू.1,15,000/- असून त्यानंतरच्या प्रत्येक वर्षासाठी दहा टक्के नैसर्गिक वाढ करण्यांत येईल. |
| 2 | श्री.रत्नाकर मुकुंदराव पंढरे | 1,76,000/- | 54,251/- | |
| 3 | श्री.राजेंद्र कोंडीबा वानखेडे | 1,76,000/- | 1,08,000/- | |

याप्रमाणे एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असून सर्वात जास्तीची निविदा श्री.राजेंद्र कोंडीबा वानखेडे यांची रक्कम रू.1,08,000/- ची प्राप्त झाली होती परंतु प्रकरणात संबंधीत ठेकेदारास वाटाघाटीस बोलवले असता संबंधीताने सदर ठेका रक्कम रू.1,15,000/- मध्ये घेण्यास संमती दर्शविली आहे व त्यास प्रशासकीय मान्यता मिळाली असल्याने प्रथम वर्षासाठी रक्कम रू.1,15,000/- आणि त्यानंतर पुढील दोन वर्षासाठी प्रती वर्ष दहा टक्के नैसर्गिक वाढ गृहीत धरून त्याप्रमाणे मत्स्य व्यवसाय करण्याचा सन 2011 ते 2013 या तीन वर्षासाठी ठेका देणे योग्य राहील.

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीच्या सावंगी (खांब तलाव) येथील तलावामध्ये मत्स्य व्यवसाय करण्याकरीता (तीन वर्षासाठी) 01 जोनवारी 2011 ते 31 डिसेबंर 2013 पर्यंत ठेका पध्दतीने देण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात जास्त दराचे निविदाधारक श्री.राजेंद्र कोंडीबा वानखेडे यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार रक्कम रू.1,15,000/- आणि त्यानंतर पुढील दोन वर्षासाठी प्रती वर्ष दहा टक्के नैसर्गिक वाढ गृहीत धरून त्याप्रमाणे मत्स्य व्यवसाय करण्याचा सन 2011 ते 2013 या तीन वर्षासाठी ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

मा.सभापती : श्री.देशमुख सभागृहात आलेले आहे. स.स.श्री.मधुकर सावंत यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

श्री.मधुकर सावंत : संबधीताची बांधकाम परवानगी टाउन प्लॅनिंग विभागाने फेटाळलेली आहे. कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती : परवानगी बाबत खुलासा देण्यात यावा.

उपअभियंता न.र. श्री.देशमुख :नगर भुमापन क्रमांक 14536/4, 14530/5 जालना रोड येथील जुबेर मोतीवाला व इतर बांधकाम परवानगीचा प्रस्ताव दाखल झाला होता तो दिनांक 01.10.2010 रोजी नामंजूर करून परत करण्यात आलेला आहे.

मा.सभापती : नामंजूर केल्याबाबत प्रशासकीय विभागास कळविण्यांत आले आहे काय?

उपअभियंता (न.र.) श्री.देशमुख : कळविले आहे.

मा.सभापती : प्रशासनाने काय कार्यवाही केली व करणार आहे.

मा.आयुक्त : श्री.देशमुख, उपअभियंता (न.र.) यांनी सांगितल्याप्रमाणे परवानगी नाकारण्यात आलेली आहे. ताबडतोब पाडुन टाकण्यात यावे.

मा.सभापती : त्या ठिकाणी आपला बोर्ड लावण्यात यावा.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका औरंगाबाद